cmyk

संपादकीय

दावे-प्रतिदावे आणि व्यक्तव्याचा कल्लोळ

काँग्रेस नेते राहुल गांधी सध्या अमेरिकेच्या दौर्यावर आहेत. ते तेथील काही संस्थांच्या निमंत्रणावरून तसेच तेथे राहणार्या भारतीय समुदायाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी तिकडे गेले आहेत. ते एक राजकीय नेते असल्याने त्यांना तेथे राजकीय प्रश्न विचारले जाणे अगदीच अपेक्षित आहे. मग त्यावरून त्यांनी आपल्या मूळ भूमिकेवर ठाम राहत जी काही वक्तव्य केलेली असतात त्यावर भारतात विशेषतः भाजपकडून तात्काळ टीकेची झोड उठवली जाते.

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

पुन्हा वाढणार दप्तराचे ओझे

अहिल्यानगर : शालेय विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्याच्या अनुषंगाने एकाच पुस्तकात सर्व विषय समाविष्ट करण्यात आले होते. यामुळे मुलांना शाळेत जाताना केवळ एक पुस्तक न्यावे लागत होते. मात्र जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना बालभारतीकडून नव्याने पुस्तके मिळणार आहेत. आता पूर्वीप्रमाणे प्रत्येक विषयाचे स्वतंत्र पुस्तक दिले जाणार आहे. अर्थात दप्तराचे ओझे पुन्हा वाढणार आहे. राज्य सरकारकडून पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके पूर्वीप्रमाणे मिळणार आहेत. गेल्या काही वर्षांपासून दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी हलके मोजक्याच पुस्तकांत सर्व विषय समाविष्ट करण्यात आले होते. पण यंदा हा नवा प्रयोग बंद होणार आहे. त्यामुळे पुस्तकांचे वजन पुन्हा वाढणार आहे. त्यानुसार अहिल्यानगर जिल्हा परिषदेने स्वतंत्र पुस्तकांची मागणी नोंदवली आहे.

बीड – महाराष्ट्र वर्ष –५ अंक–०५ गुरूवार, दि.२४ एप्रिल २०२५ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये

विम्याचे आणखी १५५८ कोटी रुपये मिळणार; भरपाईची रक्कम वाढली

राज्यातील २९ जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांच्या खात्यात विमा भरपाई जमा होणार

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील २९ जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांच्या खात्यात स्थानिक नैसर्गिक आपत्ती आणि हंगामातील प्रतिकूल परिस्थिती या दोन ट्रीगरअंतर्गत विमा भरपाई जमा होत आहे. या दोन ट्रीगरमधून शेतकऱ्यांना २२ एप्रिलपर्यंत ३ हजार १७८ कोटी रुपयांची भरपाई मंजूर झाली. यापैकी १ हजार ६२० कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले. तर १ हजार ५५८ कोटी रुपये

शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरु असल्याचे कृषी विभागाने सांगितले.

◀◀ पान २ वर

गोवर्धन चोपडे यांना मिळाली एकूण ४,४२७ रुपये भरपाई

राज्यातील २९ जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांना स्थानिक नैसर्गिक आपत्ती आणि हंगामातील प्रतिकूल परिस्थिती या दोन ट्रीगरमधून भरपाई मिळत आहे. या जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांसाठी आतापर्यंत एकूण ३ हजार १७८ कोटी रुपयांची भरपाई मंजूर झाली. त्यापैकी १ हजार ६२० कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले. तर १ हजार ५५८ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरु आहे, असे कृषी विभागाने स्पष्ट केले.

पीकविमा परतावा शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्यास प्रारंभ

स्थानिक नैगर्सिक आपत्ती आणि हंगामातील प्रतिकूल परिस्थिती या दोन ट्रीगरमधून भरपाई निश्चित करण्याचे काम अजूनही काही जिल्ह्यांमध्ये सुरुच आहे. त्यामुळे भरपाईची रक्कम वाढत आहे. राज्यातील २९ जिल्ह्यांमध्ये या दोन ट्रीगरमधून भरपाई मंजूर झाली. कोकणातील कोणत्याही जिल्ह्यात या दोन ट्रिगरमधून भरपाई मंजूर झालेली नाही. स्थानिक नैगर्सिक आपत्ती आणि हंगामातील प्रतिकूल परिस्थिती या दोन ट्रिगरमधून भरपाई मंजूर झालेले विभागनिहाय जिल्हे पुढीलप्रमाणे पुणे विभागः पुणे, सोलापूर, अहमदनगर. कोल्हापूर विभागः सातारा, सांगली, कोल्हापूर. नाशिक विभागः नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव. छत्रपती संभाजीनगर विभाग: छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना. लातूर विभागः धाराशिव, लातूर, नांदेड, हिंगोली, परभणी. अमरावती विभागः अकोला, अमरावती, बुलडाणा, यवतमाळ, वाशिम. नागपूर विभाग: नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली.

थोडक्यात...

काश्मीरमध्ये पर्यटकांची संख्या घटली

जम्मू-पहलगाम हल्ल्यानंतर काश्मीरमध्ये पर्यटकांची संख्या घटलेली पाहायला मिळत आहे. पहलगाम हल्ल्यानंतर श्रीनगरमधील दल लेक परिसराकडे पर्यटकांनी पाठ फिरवली आहे. दल लेक हा परिसर बोटींगसाठी आणि तेथील सौंदर्यासाठी प्रसिद्ध आहे पण. या हल्ल्यानंतर नेहमी गजबज असलेल्या या दल लेक परिसरात शुकशुकाट पाहायला मिळत आहे.

आता टीका टिप्पणी करण्याची वेळ नाही – सुप्रिया सुळे

पुणे-पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याबद्दल सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली. काल दिल्लीमध्ये वन नेशन इलेक्शनबाबत बैठक सुरू होती. त्या बैठकीमध्येच आम्हाला या सगळ्या घटनेची माहिती मिळाली. आम्ही सगळे खासदार तिथे होतो सगळ्यांना थोडी थोडी माहिती मिळत होती. आम्ही संध्याकाळी मुख्यमंत्री उमर अब्दुल्लांना फोन केला आणि माहिती घेतली. आम्ही पाठपुरावा करायला सुरुवात केली आणि त्यानंतर आम्हाला समजलं की पुण्यातील दोन लोकांना कदाचित गोळ्या लागल्या आहेत. खूप दुर्दैवी आपण कितीही निषेध केला तरी कमीच पडणार आहे. अत्यंत गंभीर हा विषय आहे, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.

अमित शाह हे देशाचे सर्वांत अपयशी गृहमंत्री– संजय राऊत

मुंबई-अमित शाह हे या देशाचे सर्वांत अपयशी गृहमंत्री आहेत. गुंडागर्दी करून देश चालत नाही. या देशात धार्मिक द्वेषाचं राजकारण जे हे करतायत ना, त्याचा परिणाम आहे. तुम्ही २४ तास सरकार पाडण्यात आणि नवीन सरकार बनवण्यात व्यस्त आहात. ३६५ दिवस तुमच्या डोक्यात लोकशाही संपवण्याची कारस्थानं शिजतात'', असा हल्लाबोल संजय राऊतांनी केला.

पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानला मोठा दणका

पाकमध्ये अशांतता; भारत हल्ला करणार असल्याची भीती

नवी दिल्ली । वृतसंस्था

जम्मू काश्मीरच्या पहलगामध्ये दहशतवाद्यांनी मोठा हल्ला केला. या हल्ल्यामध्ये २८ जणांचा मृत्यू झाला आहे, समोर आलेल्या माहितीनुसार या हल्ल्यातील मृतांमध्ये दोन विदेशी पर्यटकांचा देखील समावेश आहे. दरम्यान हल्ल्याच्या २४ तासांच्या आतच पाकिस्तानामध्ये अशांतता असून भारत कोणत्याही क्षणी हल्ली करु शकतो, अशी तेथील नागरीकांना भिती आहे.

२२ एप्रिलला जम्मू काश्मीरच्या पहलगामध्ये दहशतवाद्यांनी मोठा हल्ला केला. या हल्ल्यामध्ये २८ जणांचा मृत्यू झाला आहे, समोर आलेल्या माहितीनुसार या हल्ल्यातील मृतांमध्ये दोन विदेशी पर्यटकांचा देखील समावेश आहे, मृतांमध्ये महाराष्ट्रातील सहा

जणांचा समावेश आहे. या हल्ल्यानंतर संपूर्ण देशात संतापाची लाट आहे. दहशतवाद्यांविरोधात कठोर कारवाईची मागणी होत आहे. या हल्ल्यानंतर देशभरातली प्रमुख शहरांमधील सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात आली असून, जम्मू काश्मीरमध्ये सर्च ऑपरेशन सुरू आहे. दरम्यान पाकिस्तानमधून मोठी बातमी समोर येत आहे. या दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानमध्ये भीतीचं वातावरण दिसून येत आहे. याचा परिणाम हा पाकिस्तानच्या शेअर मार्केटवर देखील झाला आहे, या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत पाकिस्तानवर कारवाई करू शकतो, अशी भीती येथील

◀◀ पान २ वर

जम्मू काश्मीरमध्ये बंद

दरम्यान या घटनेचा निषेध करण्यासाठी आज जम्मू काश्मीरमध्ये कडकडीत बंद पाळण्यात आला आहे. जम्मू काश्मीरच्या अनेक भागांमध्ये आज संचारबंदी सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. जम्मू काश्मीरमध्ये दहशतवाद्यांच्या शोधासाठी सर्च ऑपरेशन राबवलं जात असून, देशातील महत्त्वाच्या शहरांमध्ये सुरक्षा वाढवण्यात आली आहे.

सुरक्षा यंत्रणांकडून दहशतवाद्याचे स्केच जारी

नवी दिल्ली-पहलगाममधील दहशतवाद्याचं स्केच जारी करण्यात आलं होतं. याच दहशवाद्याने गोळीबार करत अनेकांचा जीव घेतला. सुरक्षा यंत्रणांकडून दहशतवाद्याचं स्केच जारी करण्यात आलं आहे.

माढ्यातील ४७ लोकं काश्मीरमध्ये अडकले

माढा-पिंपळनेर गावातील मधुसूदन पेटकर कुटूबिंय तसेच पिंपळनेरचे पोलीस पाटील राहुल पेटकर यांच्यासह एकूण ४७ पर्यटक काश्मीरमध्ये अडकले आहेत. महामार्गही बंद असल्याने पर्यटक अडकलेत. विमानाने महाराष्ट्रात आणण्याची सरकारकडे मागणी करण्यात येत आहे.

पीएम मोदी दौरा अर्ध्यावर सोडून मायदेशी परतले

नवी दिल्ली-पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सौदी अरेबियाचा दौरा अर्ध्यावर सोडून मायदेशी परतले आहेत. ते बुधवारी सकाळी दिल्लीत दाखल झाले.

एकनाथ शिंदे जम्मू काश्मीरला जाणार

अजित पवारांचाही ओमर अब्दुल्ला यांना फोन

मुंबई । प्रतिनिधी

पहलगाम येथील अतिरेकी हल्ल्यात महाराष्ट्राच्या ६ जणांचा समावेश आहे. या हल्ल्यानंतर जम्मू काश्मीरात पर्यटनासाठी गेलेले शेकडो मराठी नागरीक अडकून पडले आहेत. सरकारने हे सर्वजण सुरक्षित असल्याचा दावा केला आहे. पण आता या प्रकरणी समन्वय साधण्यासाठी स्वतः उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे जम्मू काश्मीरला जाणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याकामी समन्वय साधण्यासाठी मंत्री गिरीश महाजन यांना जातीने श्रीनगरला पाठवले आहे. ते तिथे अडकलेल्या मराठी पर्यटकांशी सुसंवाद साधून त्यांना परत आणण्यासंबंधी योग्य ती उपाययोजना करणार आहेत.

◀◀ पान २ वर

अजितदादा, शरद पवार पुन्हा एकत्र येणार?

मविआतील बड्या नेत्याचे सूचक वक्तव्य

मुंबई । प्रतिनिधी

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची युती होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे, याचदरम्यान महाविकास आघाडीतील बड्या नेत्यानं दोन्ही राष्ट्रवादीबाबत देखील आता सूचक वक्तव्य केलं आहे.

मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्यासोबत युतीसंदर्भात मोठं वक्तव्य केलं आहे. महाराष्ट्राच्या हितापुढे आमची भांडणं, वाद ही किरकोळ गोष्ट

◀◀ पान २ वर

नेमकं काय म्हणाले देसाई?

काहीही होऊ शकते, अशक्य असे काहीच नाही. काही गोष्टी आणि बदल हे सतत होत असतात. पक्षाचे दोन भाग होतात दोन भाग पुन्हा एकत्र येतात. पुढचा काळ हा अतिशय उलथापालथीचा काळ आहे, अनेक घडामोडी घडू शकतात. पण महाराष्ट्राच्या हितासाठी जर घडामोडी घडत असतील तर त्याचं आपण स्वागत केलं पाहिजे. दोघांचे पुन्हा मनोमिलन कसे होते हे बघायला महाराष्ट्र उत्सुक आहे. आम्ही सुद्धा उत्सुक आहोत, असे सुभाष देसाई यांनी म्हटले आहे.

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२३ एप्रिल २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू: २०.०० क्विंटल			
	२,३६०	३,१७१	२,६४९
ज्वारी/हायब्रिड : १२५.०० क्विंटल			
	१,८४०	२,९११	२,३७३
मका/लोकल:५०.०० क्विंटल			
	२,०००	२,०००	२,०००
तूर : ३७.५० क्विंटल			
	६,६००	६,८७१	६,७६०
उडीद : १.०० क्विंटल			
	५,४००	५,४००	५,४००
बाजरी: १४८.०० क्विंटल			
	१,८४१	२,९५०	२,५२६
मुग :४.५० क्विंटल			
	६,५०१	७,४५१	६,९७६
सोयाबीन: १०२.५० क्विंटल			
	४,४०१	४,४४१	४,४२२
हरभरा: १७.०० क्विंटल			
	५,४५०	५,५३१	५,४८९

ग्रामीण रस्त्यांच्या विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणार-अमरसिंह पंडित

ईटकुर जोड रस्त्यावरील १५८ लक्ष रुपयांच्या पुल बांधकामाचा शुभारंभ

गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील रामा ५२ ते ईटकुर – शिंपेगाव – लोळदगाव रस्त्यावरील साखळी क्र. १ / ९१० वरील १५८.१३ लक्ष रुपयांच्या पुल बांधकामाचा शुभारंभ नारायणगडाचे मठाधिपती ह.भ.प. शिवाजी महाराज व जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या शुभहस्ते करण्यात आला. ग्रामीण भागातील रस्त्यांच्या

विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न सुरु असून दळणवळणाची साधने निर्माण झाल्यास या भागाचा विकास होण्यास मदत होईल असे प्रतिपादन अमरसिंह पंडित यांनी केले.

विकासाची दृष्टी अमरसिंह पंडित यांच्याकडे असल्यामुळे तेच या भागाचा विकास करू शकतील असे प्रतिपादन यावेळी ह.भ.प. शिवाजी महाराज यांनी केले. व्यासपीठावर शिंपेगाव येथील दत्त संस्थानचे मठाधिपती ह.भ.प. हनुमान महाराज गिरी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. ईटकुर येथील अखंड हरीनाम सप्ताहाच्या सांगता कार्यक्रमाला

◀◀ पान २ वर

पहलगाम हल्ल्यातील महाराष्ट्रातील मृतांच्या कुटुंबियांना ५ लाखाची मदत–मुख्यमंत्री

मुंबई । पतिनिधी

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रातील ६ पर्यटकांचा मृत्यू झाला. या मृतांच्या कुटुंबियांना राज्य सरकारच्या वतीने ५ लाखाची मदत जाहीर करण्यात आली. तसेच जखमींनाही ५० हजाराचे अर्थसाहाय्य करण्यात येणार आहे. याबाबतची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि.२३) '' वरून दिली.

पुढे बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांचे मृतदेह परत आणले जाणार आहेत. यासाठी राज्य सरकारच्या वतीने विशेष विमानाची व्यवस्था करण्यात आली आहे. ही जबाबदारी काही मंत्र्यांवर सोपविण्यात आली आहे. एअर इंडिया विमानाने श्रीनगरहून सहा पर्यटकांचे पार्थिव महाराष्ट्रात आणण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. पुढे बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, श्रीनगरहून सहा पर्यटकांचे पार्थिव आणताना कॅबिनेट मंत्री आशिष शेलार आणि मंगलप्रभात लोढा हे मुंबई

◀◀ पान २ वर

चराई अनुदानापोटी ७.३३ कोटी रुपये मेंढपाळांच्या थेट बँक खात्यात जमा-पंकजा मुंडे

मुंबई । प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या वतीने राज्यातील भटक्या जमाती (भज-क) या प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजातील ३०५४ मेंढपाळांना सन २०२४-२५ या वर्षासाठी चराई अनुदानापोटी सुमारे ७.३३ कोटी अनुदानाचे थेट हस्तांतरण (डीबीटी)द्वारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहेत. मेंढ्यांच्या चराई करिता राज्यातील मेंढपाळांना अर्थ सहाय्य उपलब्ध झाल्यामुळे मेंढपाळांना शाश्वत उत्पन्नाचा स्रोत्र निर्माण झालेला आहे आणि त्यांच्या आर्थिक प्रगतीस हातभार लागला असल्याची भावना पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्र राज्यामध्ये मेंढीपालन व्यवसाय हा पूर्णपणे स्थलांतरित पद्धतीने केला जातो. पावसाळी हंगामामध्ये मेंढपाळ त्यांच्या मूळ गावी परत आल्यानंतर पावसाळ्यात जून ते सप्टेंबर या कालावधीमध्ये मेंढ्यांना चराई करिता क्षेत्र उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण होतात. त्यामुळे चाऱ्या अभावी मेंढ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन त्यांची उत्पादकता कमी होऊन मेंढपाळ कुटुंबाचे आर्थिक नुकसान होते. त्यामुळे राज्यामधील मेंढपाळ कुटुंबाना माहे जून ते सप्टेंबर या कालावधीमध्ये मेंढ्यांसाठी चाऱ्याची कमतरता भरून काढण्यासाठी चराई अनुदान देण्याची योजना पशुसंवर्धन विभाग व इतर मागासवर्गीय

◀◀ पान २ वर

cmyk

अग्रलेख

दावे – प्रतिदावे आणि व्यक्तव्याचा कल्लोळ

काँग्रेस नेते राहुल गांधी सध्या अमेरिकेच्या दौर्यावर आहेत. ते तेथील काही संस्थांच्या निमंत्रणावरून तसेच तेथे राहणार्या भारतीय समुदायाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी तिकडे गेले आहेत. ते एक राजकीय नेते असल्याने त्यांना तेथे राजकीय प्रश्न विचारले जाणे अगदीच अपेक्षित आहे. मग त्यावरून त्यांनी आपल्या मूळ भूमिकेवर ठाम राहत जी काही वक्तव्य केलेली असतात त्यावर भारतात विशेषतः भाजपकडून तात्काळ टीकेची झोड उठवली जाते. हा गेल्या अनेक दिवसांपासूनचा परिपाठ आहे. कालही राहुल गांधी यांनी बोस्टनमध्ये भारतीय समुदायाबरोबर बोलताना, भारतातल्या निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर जोरदार आक्षेप नोंदवला.

यासंदर्भात महाराष्ट्रातील निवडणुकांचे उदाहरण देताना ते म्हणाले की, 'महाराष्ट्रात प्रौढांची जेवढी संख्या आहे त्यापेक्षा अधिक लोकांनी तेथे मतदान केले. मतदानाच्या दिवशी सायंकाळी साडेपाच ते साडेसात या वेळेमध्ये सुमारे ६५ लाख मतदारांनी मतदान केल्याचे दिसून आले आहे, हा मुद्दा लक्षात घेतला तर प्रत्येकी एका मतासाठी तीन मिनिटांचा कालावधी खर्च झाला असे गणित मांडले तर या हिशेबाने सर्व मतदान केंद्रे ही साधारणपणे दुसर्या दिवसाच्या पहाटे दोन वाजेपर्यंत उघडी राहायला हवी होती.

पण प्रत्यक्षात तसे काहीच घडले नाही. या सगळ्या प्रक्रियेची ध्वनी चित्रफीत आम्ही निवडणूक आयोगाकडे मागितल्यानंतर आम्हाला केवळ नकारच नव्हे तर थेट कायदाच बदलण्यात आला.' निवडणूक आयोगाच्या प्रणालीमध्ये काहीतरी गंभीर त्रुटी आहेत, असे वक्तव्यही त्यांनी केले आहे. राहुल गांधी यांचे हे वक्तव्य प्रसिद्ध झाल्यानंतर नेहमीप्रमाणे भाजपचे प्रवक्ते संबित पात्रा यांनी पत्रकार परिषद घेऊन राहुल गांधींवर चौफेर टीकेची झोड उठवली. राहुल गांधी यांच्याकडे राजकीय पात्रता नाही, त्यांनी विदेशी भूमीवर जाऊन भारतीय यंत्रणांची बदनामी केली, भारतीय लोकशाहीवर त्यांचा विश्वास नाही, असे आक्षेप त्यांच्यावर घेतले. देशभरातल्या अन्यही भाजप नेत्यांनी हीच लाइन पकडून त्यांच्यावर जोरदार टीका केली. त्यात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचाही समावेश होता. भाजपकडून ही टीका होणार हे अपेक्षित धरून काँग्रेसचे प्रवक्तेही सरसावून बसले होते. सुप्रिया श्रीनेत, पवन खेरा यांच्यासह अन्य काँग्रेस नेत्यांनी भाजपचा प्रतिवाद करताना मोदी यांनी चीन, दक्षिण कोरिया, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आदी देशांमध्ये भारताच्या संबंधात केलेल्या वक्तव्यांचे दाखले दिले. चीनच्या भूमीवरून बोलताना नरेंद्र मोदी असे म्हणाले होते की, सन २०१४च्या आधी भारतातील नागरिकांची अशी मानसिकता होती की आपण मागच्या जन्मी काय पाप केले की या भारतीय भूमीवर जन्माला आलो, हा काय देश आहे का असे त्यावेळी भारतीय नागरिकांना वाटत होते. अन्य देशातही त्यांनी अशीच वक्तव्य केली होती.

मोदी यांच्या त्या सगळ्या वक्तव्यांचे व्हिडिओ काँग्रेसकडून पुन्हा सोशल मीडियावर अपलोड केले गेले आणि थेट मोदींवरच हल्ले केले गेले. दोन्ही बाजूंकडून हा सिलसिला गेली अनेक वर्षे सुरू आहे. राहुल गांधी विदेशात तेथील संस्थांच्या आणि विद्यापीठांच्या निमंत्रणावरून वारंवार जातात. तिथे जाहीरपणे आपली मते ते व्यक्त करतात. आपल्यावर भाजपकडून देशाची बदनामी केली असा आरोप केला जाईल याची तमा ते बाळगत नाहीत. तरीही भाजपचे लोक त्यांच्यावर आक्षेप घेणे सोडत नाहीत आणि काँग्रेसचे नेते मोदी यांच्या विदेशी भूमीवर केलेल्या वक्तव्याचे दाखले देण्यास थांबत नाहीत. हा सगळा मामला आता करमणुकीच्या पातळीवर गेला आहे. त्याविषयीचे गांभीर्यही नष्ट झाले आहे.

आज तंत्रज्ञानाच्या युगात भारतात कोणी काही बोलले तर त्या क्षणीच ते सर्व जगातील नागरिकांना कळू शकते. त्यामुळे खरे म्हणजे आता याबाबतीत स्वदेशी भूमी किंवा विदेशी भूमी असा भौगोलिक फरक करण्याची गरज नाही आणि त्याला आता तसा अर्थही नाही. राहुल गांधी यांनी महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका झाल्यानंतर लगेचच एक पत्रकार परिषद घेऊन महाराष्ट्र तसेच हरियाणामध्ये झालेल्या मतदानातील गैरप्रकारांविषयी जाहीर वाच्यता केली होती. त्यांच्या त्या पत्रकार परिषदेची चित्रफित सोशल मीडियाच्या माध्यमातून अमेरिकेसह सर्व जगभर या आधीच पोचली होती. त्यामुळे बोस्टन येथे जाऊन पुन्हा तोच आरोप करण्यामुळे फार काही फरक पडतो असे नाही. ही बाब लक्षात घेऊन भाजपनेसुद्धा थोडी सावधगिरी बाळगायला पाहिजे, कुठल्या भूमीवरून काय वक्तव्य केले यापेक्षा एखाद्या नेत्याच्या वक्तव्याचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यावर झालेली चर्चा अधिक महत्त्वाची ठरते. पण मुद्द्यांवर कोणी काहीच बोलत नाही. भाजपवर आक्षेप घेताना काँग्रेसचे नेते पवन खेरा यांनी त्यांच्यावर असा टोमणा मारला आहे की विदेशी भूमीवर कसे बोलायचे हे आम्ही मोदींकडूनच शिकलो आहोत.

मुळात निवडणूक आयोगावर घेतलेल्या आक्षेपाला निवडणूक आयोगाने उत्तर देणे अपेक्षित असताना भाजपने त्यांची वकिली करण्याचे कारण काय हा रास्त मुद्दाही पवन खेरा यांनी त्यांनी उपस्थित केला आहे. दोन्ही बाजूंकडून तात्विक मुद्द्यांवर आपापली बाजू मांडली गेली तर लोकांना त्यातले सत्य-असत्य कळू शकेल. केवळ विदेशी भूमीवर वक्तव्य केले हा आता फार आक्षेपाचा मुद्दा मानला जाता कामा नये. आक्षेप घ्यायचा तर तो त्या नेत्याच्या वक्तव्यावर घेतला जाऊ शकेल, पण केवळ तो नेता विदेशी भूमीवर जाऊन बोलला हा आक्षेप आता कोणी मान्य करेल, असे वाटत नाही.

स्वच्छ शहर मिशनचे तीन तेरा सुशिक्षितांनाही भान नाही

रोडवर कचरा जाळल्याचा शाळेतील विद्यार्थ्यांना प्रदूषणाचा धोका

बीड । प्रतिनिधी

केंद्र शासनाने स्वच्छ भारत मिशन हा उपक्रम देशभर राबवला सर्व जिल्ह्यात हा उपक्रम राबवला जातो. बीड शहरात मात्र आजही ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग दिसतात. याचे सोयरसुतक ना नगरपालिकेला आहे ना नागरिकांना. बीड शहरातील पिंपरगव्हाण रस्त्यावर शाळेच्या कंपाउंड ला लगत कचऱ्याचे ढीग पडले आहेत. सुशिक्षित लोकही हा कचरा घंटागाडीत न टाकता या कंपाऊंडच्या कडेला टाकतात. हा कचरा नगरपालिकेने उचलला नाही तर पेटवून दिला धोका निर्माण झाला असून किमान सुशिक्षित लोकांनी तरी आपला कचरा जमा करून घंटागाडीतच टाकावा अशी अपेक्षा विद्यार्थ्यांच्या पालकातून व्यक्त केली जात आहे.

जातो. या कचऱ्याच्या धुराने या ठिकाणी असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांना प्रदूषणाचा

बीड शहरातील पिंपरगव्हाण रोडच्या लगत असलेल्या श्री श्री रविशंकर माध्यमिक विद्यालयाच्या बाजूला डीपी जवळ या परिसरातील लोक कचरा आणून टाकतात. या भागात बहुतांश सुशिक्षित लोक राहतात. मात्र तेही आपली जबाबदारी न ओळखता या ठिकाणी कचरा आणून टाकतात. नगरपालिकेने हा कचरा उचलला नाही तर या ठिकाणी मोठा ढिगारा जमा होतो. आणि त्यानंतर हा कचरा कोणीतरी पेटवून देतो. या धुराने शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होत असून या धुरामुळे त्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होत आहे. याशिवाय या कचऱ्याने जवळ असलेल्या डीपीलाही मोठा धोका निर्माण होत आहे. हा कचरा पेटवून दिल्यानंतर डीपी पेटली तर या भागातील वीजपुरवठा तर खंडित होणारच आहे. याशिवाय या रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या वाहनधारकांना आणि पदाचाऱ्यांच्या हि जीवाला मोठा धोका निर्माण होऊ शकतो. ही बाब टाळण्यासाठी या भागातील सुशिक्षितांनी आपला कचरा आपल्या घराजवळच जमा करून ठेवावा आणि घंटागाडी आल्यानंतरच हा कचरा घंटागाडी टाकावा अशी अपेक्षा या शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांनी व्यक्त केली आहे. नगरपालिकेचीही जबाबदारी आहे. वेळेवर घंटागाडी दिली तर हा कचरा जमा होणार नाही. आणि विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका होणार नाही. याची खबरदारी मुख्य अधिकारी श्रीमती नीता अंधारे यांनीही घ्यावी अशी अपेक्षा या शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांची आहे.

शुक्रवारी बीडमध्ये मोफत मूळव्याध तपासणी शिबिर

महिलांसाठी तज्ज्ञ महिला डॉक्टरांची उपस्थिती ;बीडच्या सुश्रुत मूळव्याध हॉस्पिटलचा उपक्रम

बीड । प्रतिनिधी

मुळव्याधाच्या रुग्णांसाठी मूळव्याध तज्ज्ञ डॉ. अमोल खेत्रे यांनी बीडमध्ये मोफत मूळव्याध तपासणी शिबिराचे आयोजन शुक्रवार दि. २५ एप्रिल २०२५ रोजी केले आहे. तज्ज्ञ डॉक्टरांची टिम पूर्णपणे मोफत तपासणी करणार आहे. विशेष म्हणजे महिलांच्या तपासणीसाठी तज्ज्ञ महिला डॉक्टरांची उपस्थिती राहणार आहे. हे शिबीर बीड शहरातील जालना रोड येथील सुश्रुत मूळव्याध हॉस्पिटल येथे होणार आहे. शिबिरातील रुग्णांना औषध उपचारातही सुट देण्यात येणार आहे.

मुळव्याध-भगंदर-फिशरचे लक्षणे आढळून आल्यास तत्काळ डॉक्टरांकडून तपासणी करुन घेणे गरजेचे आहे. तपासणी न केल्यामुळे मूळव्याध हा आजार वाढतच जातो. आणि त्याचे दुष्परिणाम भविष्यात रुग्णांना सहन करावे लागतात. सुश्रुत मूळव्याध हॉस्पिटल बीडच्या वतीने मुळव्याध-भगंदर-फिशरची मोफत तपासणी शुक्रवार दि. २५ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ यावेळेत करण्यात आले आहे. बीड शहरातील जालना रोड येथील डी.सी. लोढा कॉम्लेक्स, मंत्री बँकेच्या शेजारी असलेल्या सुश्रुत मूळव्याध हॉस्पिटल येथे हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे. मुळव्याध-भगंदर-फिशर याचे लक्षणे मलप्रवृत्तीच्या वेळेस किंवा नंतर रक्त पडणे, शौच्याच्या जागेवर आजुबाजुला गाठ येणे, त्यामधून चिकट स्त्रव व रक्त येणे, शौचाच्या जागी आग होणे, वेदना होणे, टोचल्यासारखे वाटणे, शौचाच्या वेळेस मांसल गोल आकाराचा भाग बाहेर येणे इत्यादी लक्षणे असल्यास त्याची तत्काळ तपासणी करुन त्यावर निदान करता येते. मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्याने हा आजार बळावतो. त्यासाठी

प्राचार्य सचिन राठोड यांचे लग्ना मंडपातच निधन

जालना । प्रतिनिधी

रेणुका महाविद्यालयाचे प्राचार्य सचिन गणेशराव राठोड यांचे उष्ण घाताचे तापमान वाढल्यामुळे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांचे वय ४७ वर्षे होते. सचिन राठोड नातेवाईकाच्या लग्नाला गेलेले असताना दुपारी साडेचार ते पाच वाजेच्या दरम्यान लग्न मंडपातच त्यांना हृदयविकाराचा झटका आला. मात्र, उपचारापूर्वीच त्यांची प्राणज्योत मावळली. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, एक भाऊ व बहीण असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी रोजी उमरखेडा या त्यांच्या मूळ गावी सकाळी १० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आला

सचिन राठोड हे आमदार राजेश राठोड यांचे चुलत बंधू होते. दोन दिवसांपूर्वीच सचिन राठोड यांचा वाढदिवस त्यांच्या मित्र परिवाराच्यावतीने साजरा करण्यात आला होता. काही वर्ष ते उमरखेडा गावचे सरपंच असतानी उमरखेडा गावाचा मोठा विकास कामे केलेला आहे असे पण सांगण्यात येत आहे.

पंधरवडा- संवाद व कृती कार्यक्रम संपन्न

जालना । प्रतिनिधी

'जलव्यवस्थापन कृती पंधरवडा अंतर्गत दि. २३ एप्रिल रोजी बदनापूर येथील कृषी विज्ञान केंद्रात ''विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्र आणि सेवाभावी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने संवाद व कृती कार्यक्रम हा उपक्रम राबविण्यात आला.

जलसंपदा विभाग व कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला कार्यक्रमासाठी कार्यकारी अभियंता रोहित देशमुख, कार्यकारी अभियंता सुरेखा कोरके, कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी प्रशांत पवार व जलसंपदा विभागाचे सर्व उपविभागीय अधिकारी समवेत सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून डॉ.पवार व डॉ.कच्छवे लाभले. यांनी ''विविध पिकांतील पाण्याचे व्यवस्थापन'' तसेच ''दुष्काळी परिस्थितीत शेतीतील करावयाचे नियोजन'' या विषयावर सर्व जलसंपदा व कृषी विभागातील अभियंता, अधिकारी, कर्मचारी, शेतकरी व सेवाभावी संस्थेला मार्गदर्शन केले.

पान १ वरून...

विम्याचे आणखी १५५८ कोटी

राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांना वेगवेगळ्या ट्रीगरमधून भरपाई मंजूर झाली आहे. विमा कंपन्यांना राज्याने आपल्या हिस्स्याचा पहिला हप्ता दिल्यानंतर स्थानिक नैगर्सिक आपत्ती आणि हंगामातील प्रतिकूल परिस्थिती या दोन ट्रिगरमधून मंजूर झालेली भरपाई देण्यास सुरुवात केली. काढणी पश्चात नुकसान भरपाई आणि पीक कापणी प्रयोग आधारित भरपाई राज्याने आपला दुसरा हप्ता दिल्यानंतर जमा होईल.

भरपाई वाढणार

राज्यात अजूनही विमा भरपाई निश्चित करण्याचे काम सुरु आहे. स्थानिक नैगर्सिक आपत्ती आणि हंगामातील प्रतिकूल परिस्थिती या दोन ट्रीगरमधून आणखी भरपाई निश्चित होऊ शकते. म्हणजेच भरपाईची रक्कम वाढू शकते, असेही कृषी विभागाने स्पष्ट केले.

पहलगाम हल्ल्यानंतर

नागरिकांना आणि गुंतवणूकदारांना आहे. त्याचा परिणाम येथील शेअर मार्केटवर झाला असून, शेअर मार्केट कोसळलं आहे. मात्र दुसरीकडे भारताच्या शेअर मार्केटमध्ये तेजी पाहायला मिळत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंम्प यांनी या दहशतवादी हल्ल्यानंतर प्रतिक्रिया देताना आम्ही भारतासोबत असल्याचं म्हटलं आहे. त्यामुळे पाकिस्तानचा शेअर बाजार कोसळला आहे. पाकिस्तानचा शेअर बाजार तब्बल १००० हजार अंकानं कोसळला आहे. तर दुसरीकडे मात्र भारती शेअर बाजारात पाचशे अंकांची उसळी दिसून येत आहे. पाकिस्तानचा शेअर बाजार १००० अंकानी कोसळून १,१७,४४० अंकावर बंद झाला. अर्थतज्ज्ञांच्या मते आता पुढील काही दिवस पाकिस्तानच्या शेअर बाजारात आणखी घसरण पाहायला मिळू शकते. दुसरीकडे या दहशतवादी हल्ल्यानंतर जगभरातून भारताला पाठिंबा मिळत असल्याचे दिसून येत आहे. लवकरच या संदर्भात भारत सरकार आता मोठा निर्णय घेण्याची शक्यता आहे.

अजितदादा, शरद पवार

असल्याचं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे. शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी देखील राज ठाकरे यांच्या भूमिकेला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाची युती होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याची चर्चा सुरू असतानाच आता दोन्ही पवार देखील पुन्हा एकत्र येणार का? अशी देखील चर्चा सुरू झाली आहे. यावर प्रतिक्रिया देताना शिवसेना ठाकरे गटाचे नेते सुभाष देसाई यांनी सूचक वक्तव्य केलं आहे.

एकनाथ शिंदे जम्मू

या हल्ल्यात ठार झालेल्या महाराष्ट्रातील ६ पर्यटकांचे मृतदेह आजच परत आणले जाणार आहेत. या पार्श्वभूमीवर आता एकनाथ शिंदे यांनी स्वतः जम्मू काश्मीरला जाऊन स्थितीचा आढावा घेण्याचा निर्णय घेतला आहे. शिंदे यांनी या प्रकरणी श्रीनगर येथे अडकून पडलेल्या कुलकर्णी कुटुंबाशी संवाद साधला. खासदार श्रीकांत शिंदे यांचे स्विय सहाय्यक अभिजीत दरेकर यांच्या माध्यमातून फोनवरून झालेल्या या संवादात शिंदे यांनी पीडित कुटुंबाला सर्वोतपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. कुलकर्णी यांनी एका खासगी वृत्तवाहिनीच्या माध्यमातून शिंदे यांच्याकडे मदतीची याचना केली होती. त्यानंतर शिंदे यांनी तत्काळ दरेकरांना त्यांच्याकडे पाठवून त्यांना दिलासा दिला होता. दुसरीकडे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधून महाराष्ट्रातील पर्यटकांना तत्काळ योग्य ती मदत करण्याचे आवाहन केले आहे. प्रत्येक पर्यटकाला सुरक्षित घरापर्यंत पोहोचवणे व त्यांच्या कुटुंबीयांना दिलासा देणे याला आमच्या सरकारचे प्राधान्य असल्याचे ते म्हणालेत.

पहलगाम हल्ल्यातील महाराष्ट्रातील मृतांच्या

विमानतळावर समन्वयासाठी उपस्थित राहतील तर मंत्री माधुरी मिसाळ यांना पुण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. तसेच कॅबिनेट मंत्री गिरीश महाजन श्रीनगरला रवाना होत आहेत. जम्मू आणि काश्मीरमध्ये असलेल्या महाराष्ट्रातील इतर पर्यटकांना परत आणण्याची तयारी सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. पहलगाम येथील भ्याड दहशतवादी हल्ल्यात प्राण गमवावे लागलेल्या महाराष्ट्रातील एकूण ६ जणांच्या कुटुंबीयांना ५ लाख रुपयांची आर्थिक मदत राज्य सरकारने जाहीर केली असून जखमींना ५०,००० रुपयांची मदत जाहीर केली आहे.

ग्रामीण रस्त्यांच्या विकासासाठी

माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी भेट देऊन उपस्थितांशी संवाद साधला.गेवराई विधानसभा मतदार संघात अतिशय दर्जेदार विकासकामे सुरु आहेत. आ. विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील रस्त्यांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध केला जात आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत राष्ट्रीय महामार्ग ५२ ते ईटकुर - शिंपेगाव - लोळदगाव रस्त्यावरील साखळी क्र. १ / ९१० वर १५८.१३ लक्ष रुपये किंमतीच्या पुल बांधकामाचा शुभारंभ बुधवार, दि.२३ एप्रिल रोजी करण्यात आला. यावेळी नारायणगडाचे मठाधिपती ह.भ.प. शिवाजी महाराज, जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित, दत्त संस्थान, शिंपेगावचे मठाधिपती ह.भ.प. हनुमान महाराज गिरी, ह.भ.प. धुराजी बाबा, ह.भ.प. करांडे महाराज, माद्ळमोहीचे सरपंच राजेंद्र वारंगे, आहेरचिंचोलीचे सरपंच विकास रकटे, माजी पं.स.सदस्य जयसिंग जाधव, दत्ता भोजगुडे, माजी सरपंच अरुण वाघमारे, उपअभियंता पोपटराव जोगदंड, नितीन विर यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. ईटकुर येथे सुरु असलेल्या अखंड हरीनाम सप्ताहाच्या सांगता प्रसंगी माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी भेट देऊन ग्रामस्थांशी सुसंवाद केला, यावेळी त्यांनी ह.भ.प. शिवाजी महाराज यांचे आशिर्वाद घेतले. ग्रामीण भागातील दळणवळण व्यवस्था सक्षम केल्यानंतर या भागातील विकास होऊ शकेल म्हणून जाणीवपूर्वक ग्रामीण रस्ते दर्जेदार करण्याचा प्रयत्न सुरु आहे. राष्ट्रीय महामार्ग ५२ पासून ईटकुर, शिंपेगाव व लोळदगाव पर्यंत रस्त्याचे काम मंजुर असले तरी भविष्यात हा रस्ता सिरसमार्ग पर्यंत जोडला जाईल त्याचबरोबर कामे दर्जेदार होतील असे प्रतिपादन जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी यावेळी केले. पंडित परिवार सातत्याने समाजाच्या सेवेत आहे, सरकार दरबारी प्रयत्न करून विकासाची कामे अमरसिंह पंडित यांच्यासारखे नेते करू शकतात, या भागातील सर्व विकासकामे त्यांच्या माध्यमातून होत असल्याचे प्रतिपादन ह.भ.प.शिवाजी महाराज यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सुधीर गाडे यांनी केले तर आभार प्राचार्य अर्जुन मासाळ यांनी मानले. यावेळी सरपंच पांडुरंग शिंदे, सरपंच विष्णू पिसाळ, अतुल नलावडे, सुभाष एरंडे, सखाराम जाधव, सरपंच बंडू परदेशी, वैजिनाथ मासाळ, त्रिंबक ढेंगळे, वसंत ढेंगळे, चेअरमन चंद्रकांत जाहेर, माणिक मासाळ, श्रीराम मासाळ, सतिष देवकते, भागवत ढेंगळे, सुनिल ढेंगळे, मच्छिंद्र वडमारे, सतिष ढेंगळे, सिध्देश्वर जाहेर, गणेश ढेंगळे, गणेश जाहेर, अमोल लोखंडे, शहादेव ढेंगळे, अशोक ढेंगळे, पांडुरंग सिराम, संतोष सिराम, हनुमान ढेंगळे, बंडू जाहेर, विनायक मासाळ, बाबासाहेब मासाळ, मधुकर ढेंगळे, माणिकराव मासाळ यांच्यासह ईटकुर, शिंपेगाव, लोळदगाव, शहाजानपूर आदी भागातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चराई अनुदानापोटी ७.३३ कोटी रुपये

विभाग यांच्या मार्फत राबविली जात असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली. राज्यामध्ये या योजनेसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळामार्फत ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आलेले असून त्यामध्ये लॉटरी पद्धतीने संगणकीय प्रणालीद्वारे त्यांची निवड यादी तयार करण्यात आलेली होती. जिल्हा व तालुका निहाय धनगर व तत्सम मेंढपाळांची संख्या विचारात घेऊन जिल्हा व तालुका निहाय लक्षांक देण्यात आलेले होते. त्यामधून पात्र मेंढपाळ कुटुंबाना माहे जून ते सप्टेंबर या चार महिन्याच्या कालावधीसाठी प्रति माह ६ हजार रुपये असे एकूण २४ हजार रुपये चराई अनुदान देण्यात आले आहे. चराई अनुदान मिळाल्यामुळे मेंढपाळ कुटुंबाना त्यांच्या मेंढ्याकरिता चारा उपलब्ध झाल्याने मेंढ्यांच्या आरोग्यामध्ये सुधारणा होऊन मेंढपाळाच्या आर्थिक उत्पन्नामध्ये भर पडत आहे. या योजनेद्वारे राज्यामधील ३०५४ लाभार्थींना रु. ७.३३ कोटी अनुदान थेट लाभधारक हस्तांतरण () द्वारे लाभार्थींच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात आलेले आहे.

टी.सी हरवला आहे

रामेश्वर शेषराव मिरकर रा. हसनापूर ता.अंबड.जि जालना संत रामदास आर्ट्स कॉमर्स सायन्स कॉलेजचा बीएससी चा टी.सी घनसावंगी अंबड जालना प्रवास दरम्यान हरवली आहे. ज्या कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर सपंर्क करा.

संपर्क: मो.८६०५९८२४४७

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार, दि. २४ एप्रिल २०२५

चौसाळा बस स्थानकाच्या परिसरातील अतिक्रमण काढणार

चौसाळा । प्रतिनिधी

चौसाळा बस स्थानकाच्या परिसरातील असणारे अतिक्रमण झालेल्या जागेवर मालकी हक्क समजून केलेले व जागा मालक झालेले अशा अतिक्रमणधारकांना ग्रामपंचायत चौसाळा यांनी वेळोवेळी सूचना करून अतिक्रमण काढावे याबद्दल सूचना दिल्या आहेत त्यानूसार आज दिनांक २४/०४/२०२५ गुरुवार रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या सूचनांच्या निसार बस स्थानकाच्या परिसरातील अतिक्रमण नागरिकांनी आप आपले अतिक्रमण स्वतः काढून घेतले आहे ज्याने काढून घेतले नाही त्याच्या अतिक्रमबाबत आज रोजी कार्यवाही करण्यात येणार आहे त्याची सर्व जबाबदारी अतिक्रमण धारकां कडे राहील करिता अतिक्रमण काढून घ्यावे असे आवाहन चौसाळ ग्रामपंचायत वतीने चौसाळा ग्रामविकास अधिकारी यांनी केले आहे

अवैधपणे दारुचा गुत्ता चालवणाऱ्या तीन महिलांविरुध्द शहर पोलीसांची कारवाई

माजलगांव । प्रतिनिधी

)येथील शहर पोलीसांना मिळालेल्या गोपनिय माहीतीच्या आधारे पोलीसांनी गौतमनगर माजलगांव येथे दि २३ एप्रिल बुधवार रोजी दुपारी ०३.१० वाजण्याच्या सुमारास छापा टाकुन तेथे अवैधरित्या दारुचा गुत्ता चालवण्याऱ्या महीला नामे अरुणाबाई प्रकाश मेंडके,निर्मला भागवत मेंडके, आश्विनी बालाजी मेंडके तीन्ही रा. गौतमनगर माजलगांव यांचे ताब्यातुन गावठी हातभट्टीची तयार

दारु, गावठी हातभट्टीची दारु तयार करण्यासाठी उपयोगात येणारे गुळमिश्रीत आंबट व उग्रट वास येत असलेले रसायन, लाकडी दिवान, टेबल,बेंच,लोखंडी बॅरल,प्लास्टीचे बकेट,प्लास्टीकचे ड्रम,काचेचे ग्लास, प्लास्टीक मग असा एकुण ७९,९००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन त्यांच्याविरुध्द गु.र.नं.१५८/२०२६ कलम ६५ (ई), ६५ (फ), ६८ महाराष्ट्र दारुबंदी कायदा कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, कमलेश मिना सहा. पोलीस अधीक्षक केज,अति. कारभार उपविभाग माजलगांव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोउपनि माकणे, पोहेकों/माधव तोटेवाड, पोहेकों/गणेश नांगरे, महीला पोहेकॉ प्रभावती ढगे यांनी केली आहे.

पंकजाताई मुंडे यांच्या जनता दरबार उपक्रमामुळे जनतेला मिळाले थेट समाधान

पाटोदा । प्रतिनिधी

भाजपा प्रदेश कार्यालय भारतीय जनता पार्टीच्या वतीने आज आयोजित करण्यात आलेल्या 'जनता दरबार' उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला. पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली, राज्यभरातून आलेल्या नागरिकांच्या तक्रारी ऐकल्या गेल्या, त्यांचे निवेदन स्वीकारले गेले आणि अनेक मुद्द्यांवर त्वरित निराकरण करण्यात आले.'जनता दरबार' हा उपक्रम लोकांना थेट मंत्री महोदयांशी संवाद साधण्याची संधी देतो, ज्यामुळे प्रशासनाशी जनतेचा संबंध अधिक सशक्त होतो. आजच्या कार्यक्रमात पंकजाताई मुंडे यांनी पर्यावरण

व पशुसंवर्धन विभागाशी संबंधित समस्या आणि इतर विभागांची तक्रार ऐकली. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना त्वरित कार्यवाहीचे निर्देश दिले.पंकजाताई मुंडे यांनी आपल्या भाषणात म्हटले, ''जनतेच्या समस्यांशी थेट संपर्क साधणे आणि त्यावर त्वरित उपाय योजणे, हे आपल्या कामाचे मुख्य उद्दिष्ट आहे. हा 'जनता दरबार' दर महिन्याला आयोजित केला जाईल आणि यामुळे प्रशासन आणि जनतेमध्ये एक दृढ संवाद निर्माण होईल.''पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी झाले होते. भाजपचा हा उपक्रम लोकाभिमुख प्रशासनाचा एक सकारात्मक टप्पा ठरत आहे.

खा.बजरंग सोनवणे यांच्या मनाचा कोतेपणा

जिल्ह्यातील तिघांची निवड झाली असताना एकाचेच केले अभिनंदन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातून लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमध्ये तीन विद्यार्थ्यांची निवड झाली असताना जिल्ह्याचे लोकप्रतिनिधी म्हणून मिरवणारे खा. बजरंग सोनवणे यांनी मात्र एकाच विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तीन विद्यार्थ्यांची निवड ही जिल्ह्यासाठी बहुमानाची गोष्ट असतानाही त्यांनी आपल्या मनाच्या कोतेपणा दाखवून एकाच विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्याचे औदार्य दाखवले.

लोकसेवा आयोगाच्या २०२४ परीक्षेचा निकाल दोन दिवसांपूर्वी घोषित झाला.

त्यामध्ये बीड जिल्ह्यातील दोन तसेच सध्या बीड जिल्ह्यात वास्तव्यास असलेल्या एक अशा तीन जणांची निवड झाली आहे. सर्व लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आदींनी या तीनही भावी अधिकाऱ्यांचे अभिनंदन करत समाज माध्यमांवर शुभेच्छा दिल्या. मात्र खासदार बजरंग सोनवणे यांनी मात्र केवळ मराठा समाजातील पंकज आवटे या एकच उमेदवाराला आपल्या सोशल मीडिया हॅण्डल वरून शुभेच्छा दिल्या. इतर दोन उमेदवार अक्षय मुंडे व सुशील गित्ते हे एका विशिष्ट समाजातील असल्यानेच सोनवणे यांनी आपल्या सोशल मीडिया हॅण्डल करून त्यांना शुभेच्छा देण्याचे टाळले. सोनवणे यांच्या या कृतीचा सोशल मीडियावर निषेध व्यक्त केला जात असून, संपूर्ण जिल्ह्याचे देशाच्या सर्वोच्च सभागृहात प्रतिनिधित्व करणाऱ्या खासदार महोदयांनी दाखवलेली संकुचित वृत्ती आणि त्यांच्या या कोतेपणा सिद्ध करणाऱ्या कृती बद्दल आश्चर्य देखील व्यक्त केले जात आहे.

तहानलेल्या वन्यजीवांसाठी बनवला ४००० हजार लिटरचा पाणवठा

कडा (प्रतिनिधी) आष्टी तालुक्याला गर्भगिरी पर्वत लाभल्याने या पर्वतात अनेक वन्यजीव राहतात उन्हाळ्यात पाण्याचे नैसर्गिक स्रोत नद्या,ओढे आटल्याने वन्यजीवांचे पाण्यासाठी हाल होतात. तर पाण्याअभावी अनेक प्रजाती नष्ट होत आहेत,पाण्याच्या शोधात वन्यजीव मानवी वस्तीत येतात बरेचदा रस्त्यावर अपघात तर काहीचा विहिरीत पडून मृत्यू होतो.कडा पिंपरखेड रस्ता येथील आडाचे माळरान डोंगर परिसरात शेतातील काही ठिकाणी झाडांना ठिबक पाईप केले आहेत या डोंगर परिसरातील तहानलेले पशुपक्षी ठिबक पाईपातील थेंबे चाटून तहान भागवताना दिसत होते या पाईपात कधी पाणी असते तर कधी नसते या ठिकाणी जीवदया फाउंडेशन टिमने जाऊन पाहाणी केल्यावर पशुपक्ष्यांचे पाण्यासाठी होणारे हाल पाहून येथील माळरानावर सिमेंट काँक्रीटचा ४००० हजार लिटर क्षमतेचा पानवठा तयार करण्यात आला. त्यामुळे येथील वन्यजीवांसाठी पाण्याची सोय झाली आहे,यासाठी कडा येथील जीवदया फाउंडेशन टीम चे

प्राणीमित्र नितीन आळकुटे, शेलैश मिश्रा,अक्षय भंडारी, गणेश पवळ,मोरे, आदींनी निष्कामपणे आपले योगदान देत पानवठा बनवला, वन्यजीवांसाठी तयार झालेल्या नवीन पानवठ्यात पिंटु भाऊ पटवा यांच्या हस्ते टँकरने पाणी सोडले त्यांनी ''एक घास एक घोट वन्यजीवांसाठी'' या उपक्रमात सहभाग घेऊन मदत केली.

तहानलेल्या वन्यजीवांसाठी पाणी उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक असते. एक घोट एक घास वन्यजीवांसाठी हा उपक्रम आठ वर्षापासून सुरू केला आहे या उपक्रमाला मित्र व लोकसहभाग प्रतिसाद मिळत असून या उपक्रमाद्वावरे कडा व परिसरातील डोंगर टेकड्या वर सिमेंट काँक्रीटचे कुत्रीम पानवठे बनवले आहे. त्यात पाच दिवसाला टँकरने विकत पाणी घेऊन टाकले जाते पाऊस पडे पर्यंत पाणी टाकण्याचे काम चालू असते.वन्य प्राण्यांसाठी पाण्याची सोय करायचे असेल तर जीवदया फाउंडेशन टिमशी संपर्क साधावा असे आवाहन प्राणीमित्र नितीन आळकुटे यांनी केले आहे.

मंत्री नामदार अतुल सावे यांच्याशी त्यांनी विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. तसेच लेखी निवेदनाद्वारे त्यांच्याकडे सर्वसामान्य भटक्या जाती जमातींच्या विकासात्मक बाबीच्या संदर्भाने आग्रही मागणी केली आहे. यावेळी त्यांच्यासमवेत अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान,या मागण्या रास्त असल्याचे मंत्री महोदयांनी मान्य करून भविष्यात या मागण्यांचा सकारात्मक विचार करून त्यावर योग्य तो तोडगा काढला जाईल आणि प्रश्न सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध राहू असा विश्वासही त्यांनी भाजपा भटक्या जाती जमाती आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्ष श्रीमती भाग्यश्रीताई ढाकणे यांना दिला. भाजपा भटक्या आघाडीच्या वतीने नामदार मंत्री माननीय अतुलजी सावे साहेबांचे आभार मानण्यात आले.

सुखासाठी परमात्म्याची प्राप्ती करून घ्यावी-मनोज देव महाराज

बीड । प्रतिनिधी

मानवी जीवनात नामस्मरणास अनन्यसाधारण महत्त्व आहे . कलियुगात किर्तन साधना सर्वश्रेष्ठ साधना आहे . त्यानेच परमात्मा प्राप्त होऊन सर्व सुख मिळते म्हणूनच सुखासाठीच परमात्म्याची प्राप्ती करून घ्यावी असे प्रतिपादन हरिभक्तिपरायण मनोज देव महाराज उमरीकर यांनी विठ्ठल मंदिर अंबिका नगर पांगरी रोड येथे द्वितीय कीर्तन प्रसंगी केले.

बीड येथील विठ्ठल मंदिर अंबिका नगर पांगरी रोड येथे विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या विसाव्या वर्धापन दिनानिमित्त विसाव्या शतकातील महान संत हरिभक्त परायण सद्गुरु ज्ञानेश्वर माऊली दादा यांच्या कृपाशीर्वादाने व तपो निधी हभप नारायण महाराज श्री संत माऊली महाराज संस्थान उत्तरेश्वर पिंपरीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व शुभ हस्ते सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात द्वितीय कीर्तनात काय नोहे केले /एका चिंतीता विठ्ठले //१//या संत तुकाराम महाराज यांच्या चार चरणी अभंगातून हरिभक्तिपरायण मनोज देव उमरीकर महाराज नामस्मरणाने सर्व दुःखाची निवृत्ती कशी होते हे सांगतात.

आपल्या अभंग निरूपणातून बोलताना मनोजदेव महाराज म्हणाले की, या जगतात मला दुःख व्हावे असे कोणीच भावना करत नाही. जो तो सुखच मागतो. सुख म्हणजे परमात्मा आहे. सुख व परमात्मा वेगळे नाहीत . अंतकरणातील सर्व विकार नामस्मरणाशिवाय जाणार नाहीत व ते अंतकरण शुद्ध होणार नाही.

अंत:करण शुद्धीसाठीच नामस्मरणाची अत्यंत गरज आहे .योग याग व तपे ही साधने कलियुगातील लोकांना आता तशी सोपी राहिलेली नाहीत. यज्ञ करण्यासाठी इच्छा ,ज्ञान, सामर्थ्य व अधिकार लागतो. ध्यान आणि पूजा करणे हेही तसे सर्वांना इतके सोपे राहिलेले नाही. कलियुगामध्ये हरिकीर्तन हे असे एक साधन आहेकी, ते सोपे व सर्वांना सहज करता येईल असे आहे . त्या नाम चिंतन साधनाने चिंतने चिंतने तद्रुपता/ या भूमिकेवर येता येते .संसाराचे चिंतन केल्यास, संसार मुळातच दुःख रूप असल्याने ते दुःख जाणार नाही. भगवत चिंतन हे भवसागरातून तरुण जाणारे एक माध्यम आहे. योग, याग व तप करणाऱ्यांचे सर्व फळ एका नामस्मरणामध्येच मिळते. असा नामाचा परिणाम असल्याने त्यांनी जन्म नाही व पापही होत नाही .ज्याने जन्म मरण ही परंपरा खंडित होते .म्हणून सर्वांनी विठ्ठल या नावाचा जप करून संसार तोडावा असेही ते यावेळी म्हणाले.

यावेळी हरिभक्त परायण नारायण महाराज गिरी (भागवताचार्य) रामहरी रसाळ गुरुजी, विभागीय प्रवक्ता अखिल भारतीय वारकरी मंडळ, श्री अनंत घीगे साहेब जिल्हा परिषदे प्रमुख वारकरी मंडळ व पत्रकार दैनिक रिपोर्टर, सुनील लांडगे, दिलीप वखरे, विठ्ठल गायके ,अजय सारंगकर गुरुजी ,रामचंद्र कागदे गुरुजी, गायक म्हणून ह भ प चिंतामण महाराज मोरे ,नवनाथ महाराज नाईकवाडे ,अंगद महाराज सातपुते ,उमाशंकर महाराज शिंदे, रामकृष्ण खटाणे महाराज मृदंग वादक म्हणून: गणेश महाराज आमटे तर असंख्य भाविक भक्त उपस्थित होते.

आदित्य शिक्षण संस्थेत राबवली जात प्रमाणपत्र पडताळणीची विशेष मोहीम

समता पंधरवाडा : जात पडताळणी प्रमाणपत्र काढण्यासह शासनाच्या विविध योजनेची विद्यार्थ्यांना दिली माहिती

बीड । प्रतिनिधी

अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग व सामाजिक आर्थिक मागास प्रवर्ग एस .ई. बी. सी. (मराठा) या मागास प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, बीड यांचे वतीने महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीचे औचित्य साधून समता पंधरवडा या विशेष मोहिमेचे आयोजन बीड शहरातील आदित्य शिक्षण संस्थेत करण्यात आले होते.

समता पंधरवडा कालावधी १ ते १४ एप्रिल दरम्यान राबवण्यात आला. यामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळणे साठी विशेष मोहिम राबवण्यात आली. आदित्य शिक्षण संस्थेत आयोजित कार्यक्रमाला संगणक विभाग प्रमुख प्रा. सलीम शेख, कार्यालयीन अधीक्षक जात पडताळणी कार्यालय बीडचे गणेश शेजाळ, प्रकल्प अधिकारी बार्टी ज्ञानोबा मात्रे, समतादूत बार्टीचे ज्ञानोबा गुजर, सहाय्यक जातपडताळणी कार्यालय बीड च्या साधना मस्के यांची उपस्थिती होती. यावेळी गणेश शेजाळ यांनी महाराष्ट्र शासनाने विद्यार्थ्यांसाठी चालू असलेल्या

योजना जसे की स्वाधार योजना,पंडीत दीनदयाल स्वयम्? योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा, आदित्य पॉलिटेक्निक बीड चे प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्रा. लक्ष्मण तांबे यांनी मानली. यावेळी प्रा. सलीम शेख,प्रा. प्रशांत दुधाळ, प्रा. अजय दुधाळ, प्रा. पी. आर. अ,प्रा. अक्षय राऊत, प्रा. शिवानी जाधव, प्रा. मिन्हाज शेख यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शुभम पवार, प्रा. प्रियंका नागरगोजे यांनी परिश्रम घेतले.

महाविद्यालयात जात वैधता प्रमाणपत्रासाठी शिबिर- प्रकल्प अधिकारी ज्ञानोबा मात्रे

प्रकल्प अधिकारी बार्टी ज्ञानोबा मात्रे म्हणाले की, अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग, सामाजिक आर्थिक मागास प्रवर्ग एस ई बी सी (मराठा) या मागास प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी करण्यात येत आहे. त्याकरिता संबंधित मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी त्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणीचे अर्ज ... या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने भरून सदर अर्जाची हार्ड कॉपी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बीड यांचेकडे सादर करावेत. तसेच बीड जिल्हयातील काही महाविद्यालयामध्ये समितीमार्फत शिबिरे आयोजित करण्यात आलेले असून त्याच ठिकाणी संबंधित अर्ज स्वीकारून त्यांना तात्काळ जात वैधता प्रमाणपत्र देण्यात येत असल्याचे ते म्हणाले.

स्पर्धा परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना निशुल्क प्रशिक्षण- संजय गुजर

बार्टीचे अधिकारी संजय गुजर म्हणाले की, बार्टी मार्फत एससी, एसटी विद्यार्थ्यांना एमपीएससी, युपीएससी, आयबीपीएस, जी, नीट, -, ई घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा करिता 'विना शुल्क अनिवासी प्रशिक्षण' आणी अभ्यास सामग्री दिली जाते. त्याचबरोबर ठरावीक असे प्रती महा विद्या वेतनही पुरवले जाते. तसेच पूर्व परीक्षा पास होऊन मुख्य परीक्षेस पात्र ठरल्यास ठरावीक 'लोकसेवा आयोग व नागरी सेवा परिक्षा' प्रमाने आर्थीक मदत दिली जाते. त्या संदर्भात तज्ज्ञ व्यक्ती मार्फत मार्गदर्शन पुरवले जाते. तसेच महा ज्योती मार्फत महाराष्ट्रातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्र वर्गाच्या विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक युगात समान संधी प्राप्त व्हावी या हेतूने पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण, //-, , आदी स्पर्धात्मक परीक्षांचे प्रशिक्षण देण्यात येते.

पान ६ वरून...

बीड जिल्ह्यात वीज पुरवठा

त्यामुळे ग्राहकाला अचानक विद्युत पुरवठा खंडित झाल्यामुळे उकाड्याचा सामना करावा लागतो. तसेच वारंवार विद्युत पुरवठा खंडित झाल्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी वर्ग शेतीवर अवलंबून असल्यामुळे त्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागतो. महावितरणच्या कारभारामुळे सर्वसामान्य शेतकरी वर्ग व्यावसायिक विद्युत पुरवठा वर अवलंबून असणारे व्यवसायिक मोठ्या प्रमाणात आर्थिक अडचणीत येतात व त्यामुळे त्यांच्या उद्योगधंद्यावर परिणाम निर्माण होतो या निवेदनाचा सहानुभूतीपूर्वक विचार करून सकारात्मक दृष्टिकोनातून निर्णय होऊन यापुढे जिल्ह्यातील विजपुरवठा खंडित होणार नाही याबाबत अधिकारी वर्ग व कर्मचारीवर्गाने सहकार्य करून ग्राहक वर्गाला दिलासा द्यावा अशी मागणी निवेदनात बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष अनिल बोर्डे व गेवराई ग्राहक पंचायत अध्यक्ष प्रा. भानुदास फलके यांनी उपकार्यकारी अभियंता यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्याशी याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली आहे.

बीड गट शिक्षण कार्यालयातर्फे

व्ही एस के ॲप वर विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती व सहभाग याची नोंद करण्याच्या सूचना. यू डायस प्लस प्रणाली अंतर्गत शिक्षक व विद्यार्थी प्रोफाइल तयार करणे व प्रमाणीकरण प्रक्रिया. ड्रॉप बॉक्स सिस्टिम संदर्भात माहितीची देवाणघेवाण सुलभ करण्याचे मार्गदर्शन. विद्यार्थी भरती व शाळांची माहिती इतर शाळांमधून आलेल्या विद्यार्थ्यांची माहिती वेळेत भरणे, व त्यांच्या प्रवेशाची प्रक्रिया सुबक करणे. पॅट ३ विद्यार्थ्यांच्या चाचणी माहितीचे संकलन व विश्लेषण. शालेय पोषण आहार व शिक्षक संवाद यासाठी स्वतंत्र माहिती अहवाल शाळांनी तयार करावा. उल्लास नवभारत साक्षरता अभियान २०२५-२६ साठी सर्वेक्षण व माहिती संकलनाचे नियोजन. एनरोलमेंट नवीन प्रवेश, वर्गनिहाय संख्या, गटातील समतोल राखणे आदी विषयांचा समावेश होता. बीड तालुकयातील सर्व केंद्र प्रमुख साधन व्यक्ती यांनी केंद्र निहाय तयार करण्यात आलेल्या दालनात विविध समस्यांविषयी मार्गदर्शन केले. कार्यशाळेमध्ये विविध शाळांतील मुख्याध्यापकांनी उपस्थित राहून अनुभवांची देवाणघेवाण केली. श्री. समंदर खान यांनी प्रत्येके मुद्द्यावर सखोल चर्चा करताना शासनाच्या नवीन धोरणांची माहिती दिली तसेच शाळांना दर्जात्मक शिक्षण पुरविण्यासाठी कृती आराखडा तयार करण्याचे आवाहन केले. कार्यशाळेचा समारोप करताना गटशिक्षणाधिकारी यांनी असे मुख्याध्यापक ज्यांचे काम पुर्ण आहे त्यांचे कौतुक केले .

मंत्री नामदार अतुल सावे

यांच्याशी त्यांनी विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. तसेच लेखी निवेदनाद्वारे त्यांच्याकडे सर्वसामान्य भटक्या जाती जमातींच्या विकासात्मक बाबीच्या संदर्भाने आग्रही मागणी केली आहे. यावेळी त्यांच्यासमवेत अन्य कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान,या मागण्या रास्त असल्याचे मंत्री महोदयांनी मान्य करून भविष्यात या मागण्यांचा सकारात्मक विचार करून त्यावर योग्य तो तोडगा काढला जाईल आणि प्रश्न सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध राहू असा विश्वासही त्यांनी भाजपा भटक्या जाती जमाती आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्ष श्रीमती भाग्यश्रीताई ढाकणे यांना दिला. भाजपा भटक्या आघाडीच्या वतीने नामदार मंत्री माननीय अतुलजी सावे साहेबांचे आभार मानण्यात आले.

व्यवसायात नुकसान झाल्याने युवकाने शेतीचा मार्ग निवडला

चिकू आणि खरबूजच्या लागवडीतून लाखोचे उत्पन्न

नांदेड : अर्धापूर तालुका हा प्रामुख्याने केळीसाठी प्रसिद्ध आहे. पन्नास टक्केहून अधिक शेतकरी आपल्या शेतात केळीचं उत्पादन घेत असतात. आता मात्र शेतकर्याचा कल केळी सोबतचं इतर फळ उत्पादनाकडे वाढला आहे. कमी खर्चात फळबाग फुलवून लाखोचं उत्पन्न मिळवत आहे. असाच काहीसा यशस्वी प्रयोग अर्धापूर () तालुक्यातील युवा शेतकरी संतोष देशमुख यांनी केला आहे. आपल्या पाच एकरमध्ये चिकू आणि खरबूजची लागवड करून वर्षाकाठी आठ लाख रुपयाच उत्पन्न त्यांनी मिळवले आहे.

संतोष देशमुख हे अर्धापूर तालुक्यातील महादेव पिपंळगाव येथील रहिवासी आहेत. त्यांना सहा एकर शेती आहे. सुरुवातीला देशमुख हे कापूस विक्रीचा व्यवसाय करायचे, मात्र त्यात त्यांना १९ लाख रुपयाचं नुकसान सोसावं लागलं. त्यानंतर त्यांनी शेतात फळबाग फुलवण्याचा निर्णय घेतला. एक एकरात चिकू फळाची बाग फुलवली. २००३ साली संतोष देशमुख यांनी सिंधुदुर्ग येथून २२० रुपये प्रति प्रमाणे चिकूची ४० रोप खरेदी केले होते. त्यांनी त्या पिकाचे मोठ्या मेहनतीने

संगोपन केलं. आता याच पिकातून त्यांना दरवर्षी ४० क्विंटल चिकूचे उत्पादन होतं असते. बाजारात ३० रुपये प्रति किलो प्रमाणे त्यांना २ लाख ४० हजार रुपयाचे उत्पन्न मिळाले आहे. विशेष म्हणजे या विक्रीमध्ये त्यानं एक रुपया देखील खर्च लागत नाही.

खरबूजच्या लागवडीतून लाखोच रुपयाचं उत्पन्न

संतोष देशमुख हे चिकूच्या फळबागेसह दरवर्षी आपल्या चार एकरमध्ये खरबूजची लागवड करत असतात. यातून त्यांना चांगल उत्पन्न देखील मिळतो. खरबूज लागवडीसाठी त्यांना ४ लाख १० हजार इतकं खर्च येतो, तर त्यातून वर्षाकाठी त्यांना ११ लाख ६० हजार रुपयाचं उत्पन्न मिळत आहे. फळांना बाजारात नेहमी मागणी असते, त्यामुळे शेतकऱ्यांनी फळबागेचा प्रयोग करावा आणि लाखोचं उत्पन्न मिळवावे, असा सल्ला युवा शेतकरी संतोष देशमुख यांनी दिला आहे.

मुलाच्या दोन्ही किडन्या निकामी; आईने किडनी देत दिले जीवदान

नांदेड शहरालगत असलेल्या भालकी गावात आईच्या प्रेमाचा प्रत्यय देणारी घटना घडलीय, गावातील ३९ वर्षीय देवानंद धाडवे या मुलांच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्या होत्या. ही घटना कळताच संपूर्ण कुटुंब हादरून गेले मात्र देवानंदची आई शिवगंगाने स्वतःची किडनी देऊन मुलाचा जीव वाचवलाय. छत्रपती संभाजीनगर इथे १५ एप्रिल रोजी किडनी प्रत्योरोपणाची ही यशस्वी शस्त्रक्रिया पार पडली असून माय-लेक सुखरूप आहेत.

गूळ तयार करण्यासाठी योग्य ऊस ओळखा

राज्यात मोठ्या प्रमाणात ऊस लागवड केली जाते. प्रामुख्याने महाराष्ट्र आणि उत्तरप्रदेश हे दोन राज्य देशातील आघाडीवरील ऊस उत्पादक राज्य आहेत. त्यामुळे या दोन्ही राज्यांमध्ये साखरनिर्मिती व्यवसाय आणि गूळ निर्मिती व्यवसाय चांगलाच बहरला आहे. मात्र आता गूळनिर्मिती करताना उसाची पारख कशी करायची? असा प्रश्न गु-हाळ चालवणाऱ्या शेतकऱ्यांसमोर असतो. साधारपणे शेतकरी पारंपरिक पद्धतीने अंदाज लावत उसाची निवड करतात. हे चुकीचे असून शेतकऱ्यांना त्यातून आर्थिक तोटा संभवतो. याच पार्श्वभूमीवर नेमकी गूळनिर्मिती व्यवसाय करताना काय काळजी घेतली पाहिजे? याबाबत आज आपण जाणून घेणार आहोत.

गूळनिर्मिती व्यवसायातील तज्ज्ञांच्या मते, ज्या उसाच्या माध्यमातून गूळनिर्मिती केली जाणार आहे. त्याची निवड करताना शेतात तोडणीच्या आधीपासूनच काळजी घेतली पाहिजे. त्यासाठी १२०० रुपयांना मिळणाऱ्या ब्रिक्स मीटर खरेदी करावे. वापरात असलेल्या उसाच्या रसाचे काही थेंब टाकून बघावेत. या मीटरमध्ये तुम्हाला आकाशी आणि सफेद असे दोन रंग दिसले. किंवा मग या मीटरमध्ये रसाची व्हॅल्यू ही २० हुन अधिक असेल तर तो ऊस गूळनिर्मितीसाठी सर्वोत्तम मानला जातो. इतकेच नाही तर गूळनिर्मितीसाठी उसाची तोडणी केल्यानंतर हा ऊस अधिक काळ तसाच न ठेवता. त्याचे २४ तासांच्या आत गाळप होणे आवश्यक असते. याशिवाय गाळपाला काहीसा वेळ असेल तर तोडणी करून आणलेला ऊस उन्हात ठेवू नये. यामुळे प्रत्येक दोन तासाला उसातील २ टक्के सुक्रोजची घट होते. हे गूळनिर्मिती साठी खूप नुकसानदायी ठरू शकते. त्यामुळे सकाळी आणल्यानंतर दिवसभरात त्या उसाचे गाळप होणे गरजेचे असते.

गाळपानंतर पुढील प्रक्रिया गूळनिर्मितीसाठी रस कढईत टाकण्याची असते. उसाचा कढईत टाकल्यानंतर त्यातील सुक्रोज हे ग्लूकोज आणि फ्लोक्टोजमध्ये रूपांतरित होऊ नये. म्हणून शेतकऱ्यांनी काळजी घेतली पाहिजे. यासाठी तुरटीचा वापर देखील केला जाऊ शकतो. किंवा मग संबंधित उसाच्या रसाचा पीच देखील जाणून घेतला जाऊ शकतो. तो ६.४ ते ६.८ दरम्यान असणे आवश्यक असते. संपूर्ण गूळनिर्मिती प्रक्रिया दरम्यान खूप काळजी घ्यावी लागते. मात्र, या त्यातील काही महत्वाच्या स्टेप्स आहेत. ज्या गूळनिर्मिती व्यवसायातील तोटा कमी करण्यास अर्थात आर्थिक नुकसान टाळण्यास मदत होते. याशिवाय शेतकऱ्यांनी उसाचा रस काढण्यासाठी हॉरिजॉन्टल क्रॉशर (आडवे रस यंत्र) वापरले पाहिजे. ज्यामुळे १० टक्के अधिक रस मिळण्यास मदत होते. इतकेच नाही तर कढईमध्ये रस उकळवताना ११४ डिग्रीपर्यंत उकळला पाहिजे. त्यापेक्षा अधिकही नको आणि कमीही नको. या योग्य तापमानात रस उकळल्यास त्यातून उत्तम प्रतीचा गूळ बनतो. साखर कारखान्यात साखर तयार करण्यासाठी १२१ डिग्रीपर्यंत उसाचा रस उकळला जातो.

शेतकऱ्यांनो दुधी भोपळ्याचा कडवटपणा घालविण्यासाठी करा हे उपाय

महाराष्ट्रात भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. भाजीपाल्याला बाजारात बाराही महिने मागणी असते. त्यामुळे त्यास बऱ्यापैकी भाव देखील मिळतो. ज्यामुळे शेतकऱ्यांना भाजीपाला पिकांमधुन पारंपारिक पिकांपेक्षा नेहमीच चांगले आर्थिक उत्पन्न मिळते. भाजीपाल्यामध्ये काही शेतकरी हे दुधी भोपळ्याची लागवड करतात. मात्र, भोपळा पीक घेताना त्याच्या चवीबाबत शेतकऱ्यांना सर्वात मोठी समस्या असते. अर्थात शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला भोपळा हा चवीला कडू लागत असेल, तर अशा भोपळ्याच्या उत्पादनानंतर त्यास ग्राहक मिळणे कठीण असते. परिणामी, शेतकऱ्यांनी भोपळा पीक घेताना कोणती काळजी घेतली पाहिजे, जेणेकरून उत्पादित भोपाळ हा कडवट लागत नाही.

भोपळा कडू का लागतो? : कधी-कधी भोपळ्याचे उत्पादन घेताना काही गोष्टींकडे दुर्लक्ष झाल्यास, उत्पादित भोपळा कडू लागतो. यात प्रामुख्याने थंड हवामान असलेल्या किंवा मग समुद्रसपाटीपासून अधिक उंच असलेल्या भागांमध्ये शेतकरी भोपळा उत्पादन घेत असतील. तेव्हा ही समस्या जाणवते. याशिवाय वातावरणातील बदलांमुळे देखील ही समस्या जाणवत असते. यात तापमानात चढ-उतार, भोपळा लागवड केलेल्या जमिनीचा सामू कमी असणे, किंवा मग अचानक भोपळा पिकाला पाण्याच्या ताण पडणे ही प्रमुख कारणे असतात. याशिवाय लागवड केलेल्या जमिनीमध्ये पोषकतत्वे कमी असल्यास, याशिवाय तोडणी केल्यानंतर बाजारात नेईपर्यंत अयोग्य पद्धतीने हाताळणी करणे ही देखील कारणे त्यास कारणीभूत असतात. इतकेच नाही तर सायन्टिफिकदृष्ट्या शेतकऱ्यांनी केलेल्या भोपळ्यामध्ये कुकुर्बिटासिन या घटकाचे प्रमाण अधिक असेल. तर भोपळ्याला कडवटपणा लागतो.

करा 'हे' महत्वाचे उपाय : भोपळा लागवड करताना शक्यतो मांडव पद्धतीने शेडनेट उभारणे आवश्यक ठरते. ज्यामुळे वातावरणीय बदलाचा परिणाम होत नाही. सामू ५.५ ते ७ पर्यंत असलेल्या जमिनीची भोपळा लागवडीसाठी निवड करावी. भोपळा पिकाला उच्च तापमानाचा फटका बसणार नाही, याची काळजी घ्यावी. याशिवाय लागवडीनंतर काढणीपर्यंत पिकाला पाण्याचा ताण पडू देऊ नये. जमिनीत पोषकतत्वे कमी असल्यास वेळोवेळी खतांची मात्रा द्यावी. काढणीनंतर भोपळ्याची सुयोग्य पद्धतीने हाताळणी करावी. भोपळ्यामध्ये कुकुर्बिटासिनचे प्रमाण कमी राहू नये, यासाठी शेतकऱ्यांनी भोपळ्यास नायट्रोजन खतांचा वापर करणे गरजेचे असते.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१६३५ : अमेरिकेतील पहिली सार्वजनिक शाळा बोस्टन लॅटिन स्कूल स्थापन झाली.

१७७४ : ब्रिटीश कमांडर कर्नल चेम्पमेन यांनी रोहिलखंड येथील रोहिला सेनेचा पराभव करून रोहिलखंड आपल्या ताब्यात घेतले.

१८१८ : दोनशे युरोपियन व दोनशे एतद्देशीय शिपायांसह इंग्रज अधिकारी मेजर हॉल यास कर्नल प्रॉयर याने रायगड किल्ल्याची टेहळणी करण्यास पाठविले. चैत्र व. ३

१८९१ : रुस देशाची राजधानी मास्को येथिल यहुदी धार्मिक लोकांना देशाबाहेर काढून देण्यात आले.

१९३५ : युरोपियन राष्ट्र पोलंड ने संविधान आमलात आणले.

१९८४ : वैज्ञानिकांनी एड्स या विषाणूचा शोध लावला.

१९९० : नामिबिया संयुक्त राष्ट्रांत प्रवेश होऊन तो १६० वा सदस्य देश बनला.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५६४ : विल्यम शेक्सपियर, इंग्लिश साहित्यिक.

१५६४ : विल्यम शेक्सपिअर - इंग्लिश नाटककार आणि अभिनेता. युनेस्कोने घेतलेल्या पुढाकारामुळे विल्यम शेक्सपिअर यांच्या सन्मानार्थ १९९५ पासून आजचा दिवस हा 'जागतिक पुस्तक दिन' म्हणून साजरा केला जातो. (मृत्यू: २३ एप्रिल १६१६)

१७९१ : जेम्स बुकॅनन - अमेरिकेचे १५ वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: १ जून १८६८)

१८५८ : मॅक्स प्लँक - नोबेल पारितोषिक विजेते जर्मन भौतिक शास्त्रज्ञ (मृत्यू: ४ आक्टोबर १९४७)

१८५८ : पंडिता रमाबाई - विधवा, परिक्त्यक्ता आणि स्त्रियांच्या सर्वांगीण उद्धारासाठी कार्य करणाऱ्या समाजसुधारक आणि 'आर्य महिला समाज' च्या संस्थापिका, संस्कृत पंडित (मृत्यू: ५ एप्रिल १९२२)

१८७३ : महर्षि विठ्ठल रामजी शिंदे - अस्पृश्यता निवारण हे जीवनध्येय मानलेले व्यासंगी समाजसुधारक (मृत्यू: २ जानेवारी १९४४)

१८९७ : लेस्टर बी. पिअर्सन = कॅनडाचे १४ वे पंतप्रधान आणि नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: २७ डिसेंबर १९७२)

१९२७ : हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या गायिका व सर्बहार वादक अन्नपूर्णा देवी यांचा जन्मदिन.

१९३८ : एस. जानकी - शास्त्रीय गायिका

२००५ : मी ॲट द झू हा पहिला व्हिडिओ युट्यूब वर प्रकाशित झाला.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६१६ : विल्यम शेक्सपिअर इंग्लिश नाटककार आणि अभिनेता. युनेस्कोने घेतलेल्या पुढाकारामुळे विल्यम शेक्सपिअर यांच्या सन्मानार्थ

१९९५ : पासून आजचा दिवस हा 'जागतिक पुस्तक दिन' म्हणून साजरा केला जातो. (जन्म: २३ एप्रिल १५६४)

१८५० : विल्यम वर्डस्वर्थ - काव्यातील स्वच्छंदतावादाचे प्रणेते इंग्लिश कवी. त्यांची 'डॅफोडिल्स' ही अतिशय गाजलेली कविता आहे. (जन्म: ७ एप्रिल १७७०)

१९२६ : हेन्री बी. गुप्पी - ब्रिटिश वनस्पतीशास्त्रज्ञ (जन्म: २३ डिसेंबर १८५४)

१९५८ : शंकर श्रीकृष्ण देव - निष्ठावान समर्थभक्त, समर्थ वाङ्मयाचे आणि संप्रदायाचे अभ्यासक व प्रकाशक (जन्म: १० आक्टोबर १८७१)

१९६८ : संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय पटियाला घराण्यातील हिंदुस्थानी शास्त्रीय गायक उस्ताद बडे गुलाम अली खान यांचे निधन.

१९७३ : हिंदी आणि ब्रजभाषेतील प्रख्यात कवी आणि लेखक धीरेंद्र वर्मा याचं निधन.

१९९२ : सत्यजित रे - ख्यातनाम चित्रपट निर्माते व दिग्दर्शक आणि भारतरत्न. 'पथेर पांचाली' या त्यांच्या पहिल्याच चित्रपटाला देशविदेशात अनेक गौरव मिळाले. त्यांना विशेष ऑस्कर पुरस्कारही देण्यात आला होता. (जन्म: २ मे १९२१)

२००० : मराठी चित्रपटांना आधार मिळावा या ध्येयाने प्रेरित होऊन गेली ४० वर्षे लालबागमधील 'भारतमाता' चित्रपटगृह चालवणारे यशवंत सदाशिव ऊर्फ बाबासाहेब भोपटकर यांचे निधन.

२००१ : जयंत श्रीधर तथा जयंतराव टिळक - संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे एक नेते, गोवा मुक्ती संग्रामातील एक झुंजार सेनापती, लोकमान्य टिळकांचे नातू, राजकारण, समाजकारण, साहित्य, पत्रकारिता, तत्त्वज्ञान, विज्ञान, निसर्ग आणि शिकार इ. विविध क्षेत्रांमधे दीर्घकाळ सक्रिय असणारे महाराष्ट्र विधान परिषदेचे अध्यक्ष व केसरीचे संपादक (जन्म: १२ आक्टोबर १९२१)

२०१३ : शमशाद बेगम - पार्श्वगायिका (जन्म: १४ एप्रिल १९१९).

केळी रोपे वाचविण्यासाठी क्रॉप कव्हरचा वापर

आपण पिकविलेल्या मालाला कुठल्या काळात बाजारपेठेत दर मिळतात याचा अभ्यास आता तरुण पिढी करते आहे. यामुळेच केळीच्या रोपांची मार्च-एप्रिलमध्ये लागवड करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला. एप्रिल-मे-जूनमधील तीव्र उष्णतेचा रोपांना सामना करावा लागू नये यासाठी क्रॉप कव्हर तसेच इतर एकात्मिक उपाययोजनांवर शेतकरी जोर देत असल्याचे दिसून येते.

केळीचे पीक मोठ्या प्रमाणात शेतकरी घेऊ लागले आहेत. केळी लागवड पावसाळ्यात म्हणजेच जून-जुलैमध्ये केली जात होती. हा कालावधी योग्य मानला जात होता. पण आता ठिबक सिंचन व पुरेशा पाण्याची व्यवस्था असलेले शेतकरी फेब्रुवारी ते मार्च या काळात लागवड करू लागले आहेत. या बागेतून येणाऱ्या मालाला चांगला दर मिळत असतो, असा शेतकऱ्यांचा अनुभव आहे. मात्र या लागवडीच्या रोपांना रखरखत्या उन्हाच्या झळा सर्वाधिक सोसाव्या लागतात. यावर उपाय म्हणून शेतकरी केळीची रोपे तापमानापासून वाचवण्यासाठी क्रॉप कव्हरचा वापर करू लागले. या पद्धतींमुळे रोपांचा उष्णतेपासून बचाव करण्यास मदत होते. केळी हे पीक दमट हवामान व मध्यम तापमानात येणारे आहे. तरिही शेतकऱ्यांनी अतिशय कोरड्या व उष्ण वातावरणात वर्षानुवर्षे दर्जेदार केळीचे उच्चांक स्थापित केले आहेत. यंदा मार्चपासूनच तापमानाने चाळिशी पार केली असल्याने एप्रिल-मे मधील केळी लागवड कशी करावी, असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे आहे.

प्लास्टिकचे कव्हर लावून रोपाला वरून टोपी घाला : केळीच्या रोपाभोवती ताग (बोरू) लावला की सावलीमध्ये केळीच्या रोपांची लागवड करावी. यासाठी रोप लागवडीपूर्वी महिनाभर आधी ताग लागवड करा. जेणेकरून सावलीमुळे कोवळ्या केळीरोपांचे उष्णतेपासून संरक्षण होईल. जमिनीतील ओलावा टिकून राहील. तसेच केळी रोपाच्या चोहोबाजूंनी १२ ते १४ इंच उंच प्लॅस्टिकचे कव्हर लावून रोपाला वरून टोपी घालावी. जेणेकरून जमिनीचा ओलावा व ठिबकच्या पाण्याने आर्द्रता तयार होऊन रोपांचा उष्णतेपासून बचाव होईल. यापैकी कोणतीही व्यवस्था नसेल तर कापणी झालेल्या केळी बागेतील हिरवी पाने वापरावीत. ही पाने रोपांना सावली मिळेल अशा पद्धतीने जमिनीत उभी ठेवावीत. मल्चिंग पेपरचा वापर केल्यास तण नियंत्रण होते. पाण्याची बचत, जमिनीचे तापमान नियंत्रण आणि कीड-रोग नियंत्रणासाठी होतो.

मातीला आच्छादन दिल्याने पाण्याचे बाष्पीभवन कमी होते. जमिनीचे तापमान नियंत्रित ठेवण्यास मदत करते, काही कीटक आणि रोगांना रोखण्यास मदत करते, ज्यामुळे पिकांचे नुकसान कमी होते. शेतीमालाची गुणवत्ता सुधारते, तसेच उत्पादनामध्ये वाढ होते.

गायरान धारकाचे न्यायासाठी टॉवरवर चढून आंदोलन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे जवळगाव येथील गायरान जमीन चाळीस वर्षे पासून कसणार्या जमिनीवर सौर ऊर्जा प्लँट उभा राहतोय आणि रिकामी पडीक जमीन तसेच ठेवून गरीब कुटुंब उध्वस्त होते आहेत. म्हणून अनेक दिवसांपासून वेगवेगळे आंदोलन चालू आहे. याचाच भाग गायरान धारक शेतकरी नवनाथ हारे आज सकाळी गायरान धारक नवनाथ हारे हे सकाळी सहा वाजता तहसील कार्यालय येथील वायरलेस टाँवर वर चढून आम्हाला न्याय द्या अन्यथा आत्महत्या करतो म्हणून तीन तास टाँवरवर चढून बसले.यामुळे प्रशासनाची धावपळ झाली. तोडगा काढण्यासाठी उर्जा कंपनी सोबत बैठकीचे लेखी पत्र दिल्यानंतर आंदोलक खाली उतरले. दि.१८ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात आम्ही खालील सह्या करणारे मौजे जवळगांव ता. अंबाजोगाई जि. बीड येथील रहिवाशी असुन अंबाजोगाई जवळगांव शिवारातील गट नं. २११ मधील सरकारी जमिन गेल्या ४० वर्षापासुन वहिती करुन कुटूंबाची उपजिवीका भागवितोत. आमच्याकडे महसुली पुरावे आहेत. तरी पण अंबाजोगाई तहसिल कार्यालयाच्या चुकीमुळे आमच्या ताब्यातील जमिन महावितरण(पारेषण) ला करार करुन भाडे तत्वावर वर्ग केली भाडे तत्वावर दिली आहे.

एकुण त्या गटनंबर मध्ये ३१ एक्कर जमीन असुन त्यापैकी १५ एक्कर जमीन वहिती करुन आम्ही उपजिवीका भागवितो बाकी जमीन ही पडीक - असुन जर कंपनीला देयाची असेल तर वहिती जमीन सोडून आपण रिकामी जमीन महावितरणाने ती खाली जमीन गंगामाऊली सौर उर्जा प्लॅटला सौर उर्जासाठी दयावी.आमचा विरोध नाही मात्र गंगामाऊली प्लंट सौर उर्जा प्रा.लि. चे काम बंद केलेनाही व त्यांच्या जागेचा प्लांट स्थालांतरीत नाही केल्यामुळे वरील सर्व हकीकत सांगितली आहे आम्ही वारंवार सरकारकडे आपल्याकडे दाद मागत आहे. याची कोणीही दखल घेत नाही. त्यामुळे सरकार व स्थानिक प्रशासनाच्या जाचास त्रयस्त झाल्यामुळे आम्हाला सगळ्यांना फाशी घेण्याची व आत्महत्या करण्याची मा. जिल्हाधिकारी साहेबांनी परवानगी देण्यात यावी. तसेच दिनांक २२/०४/ २०२५ रोजी तहसिल कार्यालयामध्ये



किंवा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर व इतर ठिकाणी आम्ही कोठेही फाशी घेणार आहोत तरी आमच्या अर्जाची नोंद घेण्यात यावी असे नवनाथ तुळशिराम हारे, माणिक विठोबा आगळे, बाळासाहेव शेषेराव हारे, राणबा भागुजी गव्हाणे, विजय लिंबाजी कांबळे, गोविंद तुकाराम मोहिते यांच्या सह ईतरांनी दिले होते. त्या नुसार आज सकाळी गायरान धारक नवनाथ हारे हे सकाळी सहा वाजता तहसील कार्यालय येथील वायरलेस टाँवर वर चढून आम्हाला न्याय द्या अन्यथा आत्महत्या करतो म्हणून तीन तास टाँवरवर चढून बसले. उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे यांनी सदरील प्रकरणी सदरील कंपनी व गायरान धारक,सामाजिक कार्यकर्ते यांची संयुक्तबैठक उपजिल्हाधिकारी कार्यालयात मार्ग काढण्यासाठी लावली असुन काय मार्ग निघतो ते संध्याकाळी कळेल. तहसील कार्यालयात घटनेची माहिती मिळताच नायब तहसीलदार बाहेती मँडम,देशपांडे, तलाठी चव्हाण पोलिस निरीक्षक विनोद घोळवे अग्निशमन कर्मचारी इंगळे यांच्या सह इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

योगेश्वरीत महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीराचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी,श्रीमती कमल खुरसाळे स्मृती न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने ०१ मे ते ०८ मे पर्यंत चालणाऱ्या महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीराचे उद्घाटन ०१ मे रोजी श्रीमती गो.कु. यो.कन्या विद्यालयात होत असून अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर हे असून उद्घाटक म्हणून आ.नमिता मुंदडा तर प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक कार्यकर्त्या रुक्साना मुल्ला आदी उपस्थित राहणार आहेत. या शिबीरात शुक्रवार ०२ मे रोजी कोल्हापुर येथील चेतन घाटगे,अन्वि चेतन घाटगे हे ' गिर्यारोहण भ्रमंती एक विलक्षण अनुभव' या विषयावर बोलणार आहेत शनिवार ०३ मे रोजी परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्या ऍड.माधुरी क्षीरसागर ह्या किशोरवयीन मुले व मुली समोरील आव्हाने या विषयी मनोगत व्यक्त करतील रविवार०४ मे रोजी दिपाली जाधव ह्या महिलांनी चालताना ठेवायचे भान व वाहतुक कायदा व सुव्यवस्था' या विषयी बोलणार आहेत तर सोमवार ०५ मे ला सिद्धार्थ सोनवणे (शिरूर कासार) वन्य जीवांच्या संरक्षणातील भुमिका याविषयी तर मंगळवार ०६ मे श्रीमती रिटा रॉड्रीम्युस ह्या 'जल सुरक्षा आणि मी' या विषयी तर ०७ मे रोजी डॉ.अपर्णा कुलकर्णी ह्या ' हृदय व फुफ्फुसीय पुनरुत्थान' या विषयावर मत व्यक्त करणार आहेत ०८ मे रोजी शिबीराचा समारोप योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांच्या अध्यक्षतेखाली, अंबाजोगाई नगर परिषदेच्या मुख्याधिकारी प्रियंका टोंगे यांच्या उपस्थितीत होईल. या सर्व कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर, उपाध्यक्ष जी.बी.व्यास, कार्यकारी उपाध्यक्ष ऍड.जगदीश चौसाळकर, कोषाध्यक्ष डॉ.शैलेष वैद्य,सहसचिव प्रा.भीमाशंकर शेटे, शिबीर प्रमुख तथा यो.शि.संस्थेचे संचालक आर.व्ही.सोनवळकर, महिला प्रतिनिधी संचालिका ऍड. कल्याणी विर्धे,प्राचार्य डॉ.एम.व्ही.कानेटकर, प्रा.डॉ.प्रविण भोसले इतर क्रिडा प्रबोधिनी सदस्य यांच्या वतीने करण्यात आले आहे.

मानसिक शांतीसाठी राजयोग केंद्र तयार - उषा दिदी

ब्रह्मकुमारीज केंद्राचा लोकार्पण सोहळा संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या नवीन 'प्रभू दर्शन भवन' वास्तूचे लोकार्पण सोहळा दि.२२ एप्रिल मंगळवार रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमासाठी ब्रह्माकुमारी मुख्य ठिकाण माउंट आबू येथील राजयोगिनी उषा दिदी, आंतरराष्ट्रीय प्रेरणादायी वक्त्या, तसेच उद्घाटक आ. प्रकाश सोळंके तर प्रमुख पाहुणे रामेश्वर कानडे, संस्थापक अध्यक्ष मंगलनाथ मल्टीस्टेट माजलगाव, राजयोगिनी सोमप्रभा दिदी संचालिका उपक्षेत्र सोलापूर, राजयोगिनी अर्चना दिदी परभणी सेवा केंद्र,संगीता बाहेन बार्शी,मेरादिदी अंबड,राजयोगी ब्रह्मकुमार भरत भाई मुख्य अभियंता माउंट आबू,प्रज्ञादिदी सेवा केंद्र बीड यांच्या हस्ते ब्रह्माकुमारी सेंटरचा लोकार्पण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांचे स्वागत थाटामाटात ढोल ताशाच्या गजरामध्ये पुष्पांची

उधळण करून केले.उद्घाटक व पाहुण्यांच्या हस्ते झेंडावंदन करून फित कापण्यात आली.सर्व मान्यवरांचे स्वागत सत्कार सेवा केंद्र संचालिका अनिता दिदी व शिलादिदी यांनी केला.ही 'प्रभू दर्शन' वास्तू उभारण्यासाठी ज्यांनी सहयोग केला त्या सर्वांचे सत्कार करण्यात आले.मुख्य वक्त्या राजयोगिनी ब्रह्मकुमारी उषा दिदी म्हणाल्या या वास्तूचा उपयोग आपल्या सर्वांचे जीवन अंधाराकडून प्रकाशाकडे नेण्यासाठी आहे. उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती पत्रकार उमेश जेथलिया,सुदर्शन स्वामी,सखाराम तौर वरिष्ठअभियंता,बाळू ताकट समाजसेवक, प्राध्यापक संगीता जाधव हे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दूरचित्रवाहिनी निवेदिका अनिता करवा यांनी केले तर आभार बालाजी बचाटे यांनी मानले. सर्व उपस्थित बंधू भगिनीनी सुरुची भोजनाचा आस्वाद घेतला.या कार्यक्रमासाठी मोलाचे सहकार्य दिगंबर सादोळकर, केशव बादाडे, कैलास सोळंके, सिद्धेश्वर भाई, शिवाजी भाई, नामदेव भाई तसेच माता-भगिनी यांनी केले.

सप्तखंजरीवादक तुषार सूर्यवंशी यांच्या समाज प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

संपूर्ण महाराष्ट्रात गाजत असलेले सत्यपाल महाराज यांचे शिष्य सप्तखंजरीवादक, राष्ट्रीय प्रबोधनकार तुषार सूर्यवंशी, नागपुर (दुरदर्शन, झी मराठी कलाकार) यांचा समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम ज्ञानरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त सोमवार, दि.२८ एप्रिल २०२५, सायंकाळी ६ वाजता मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह, अंबाजोगाई (जि.बीड) या ठिकाणी आयोजित केला आहे. अशी माहिती आयोजक अतुल कसबे (अध्यक्ष, माय सेवा प्रतिष्ठाण) यांनी दिली आहे.

माय सेवा प्रतिष्ठाणचे अध्यक्ष अतुल कसबे हे ज्ञानरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त उपक्रम दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम आयोजित करतात. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून या वर्षी केज विधानसभा मतदारसंघाच्या कार्यसम्राट आमदार सौ.नमिताताई अक्षय मुंदडा यांच्या नेतृत्वाखाली तसेच ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा (काकाजी) व युवा नेते अक्षय मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात गाजत असलेले सत्यपाल महाराज यांचे शिष्य सप्तखंजरीवादक, राष्ट्रीय प्रबोधनकार तुषार सूर्यवंशी, नागपुर (दुरदर्शन, झी मराठी कलाकार) यांचा समाज प्रबोधनात्मक

कार्यक्रम ज्ञानरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त सोमवार, दि.२८ एप्रिल २०२५, सायंकाळी ६ वाजता मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह, अंबाजोगाई (जि.बीड) या ठिकाणी आयोजित केला आहे. तरी या कार्यक्रमास अंबाजोगाई शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक अतुल कसबे (अध्यक्ष, माय सेवा प्रतिष्ठाण) व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले आहे.

तुषार सूर्यवंशी (नागपुर) यांचे नांव आज संपूर्ण महाराष्ट्रात गाजत आहे. सूर्यवंशी हे सत्यपाल महाराज यांचे शिष्य आहेत. ते सप्तखंजरीवादक, राष्ट्रीय प्रबोधनकार आहेत. दुरदर्शन, झी मराठी वाहिनीवरील कलाकार आहेत. राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या सार्वजनिक उपक्रमांतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान यांच्या वतीने सामाजिक क्षेत्रात अमूल्य योगदान करणारे, कीर्तनाच्या, प्रबोधनाच्या व गीतांच्या माध्यमातून समाजात महापुरूषांचे संत महात्म्यांचे विचार पोहचविण्याकरिता प्रबोधन करणाऱ्या कलाकारांना दिला जाणारा संत चोखामेळा साहित्य पुरस्कार त्यांना प्राप्त झाला आहे. तुषार सूर्यवंशी यांनी संपूर्ण महाराष्ट्र तसेच आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, छत्तीसगड, पंजाब इत्यादी राज्यांमध्ये संविधान जनजागृती, ग्राम स्वच्छता अभियान, आदर्श गाव, तंटामुक्ती अभियान, व्यसनमुक्ती, निर्मल ग्राम, शिक्षण, आरोग्य, बालसंस्कार, शासनच्या जनकल्याणकारी योजना, परिवर्तनवादी विचार, नेत्रदान - देहदान - रक्तदान इत्यादी विषयामधून फुले, शाहू, आंबेडकर, संत गाडगेबाबा, संत चोखामेळा, संत तुकडोजी महाराज, संत कबीर, अण्णाभाऊ साठे, संत रविदास इत्यादी संत महापुरूषांचे परिवर्तनवादी विचार समाजातील तळागाळापर्यंत प्रबोधनाच्या माध्यमातून पोहचविण्याचे कार्य केले आहे. तुषार सूर्यवंशी यांनी संपूर्ण भारतात १९०० पेक्षा अधिक कार्यक्रम सादर केले आहेत. आतापर्यंत तुषार सूर्यवंशी यांना विदर्भ गौरव पुरस्कार, महाराष्ट्र रत्न पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा व्यसनमुक्ती पुरस्कार, समाजप्रबोधन पुरस्कार, नागपूर भूषण पुरस्कार, युवा कलारत्न पुरस्कार, फुले-शाहू आंबेडकर समता पुरस्कार असे विविध ५० पेक्षा अधिक प्रतिष्ठेचे पुरस्कार मिळाले आहेत.

डॉ. शशांक पाठक यांची अध्यक्षपदी निवड

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अष्टांग आयुर्वेद असोसिएशन, अंबाजोगाई शाखेच्या नूतन कार्यकारणीच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या असून, अध्यक्षपदी डॉ. शशांक पाठक यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.उपाध्यक्ष म्हणून डॉ. प्रिया मुळे, सचिव डॉ. पांडुरंग बोंद्रे, सहसचिव डॉ. कमलाकर साखरे आणि कोषाध्यक्ष म्हणून डॉ. आशीष दरगड यांची निवड झाली आहे. कार्यकारणीतील इतर सदस्यांमध्ये डॉ. श्रीराम काळे, डॉ. अमोल बर्दापूरकर, डॉ. दीपक फुटाणे, डॉ. शितल दरगड, डॉ. संदीप जैन, डॉ. उमाकांत गाढवे, डॉ. राहुल वरोडे आणि डॉ. अनघा पाठक यांचा समावेश आहे. या निवडणुकीसाठी पीठासीन अधिकारी म्हणून डॉ. महेंद्र लोमटे यांनी काम पाहिले. या प्रसंगी अध्यक्ष डॉ. शशांक पाठक यांनी नूतन कार्यकारिणीच्या वतीने संघटनेच्या भावी वाटचालीसंदर्भात आपली भूमिका मांडली. सर्व सदस्यांच्या वतीने नूतन कार्यकारणीस हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

कुसळंबची भीम जयंती विचाराची, नवसंकल्पाची, जनतेच्या हिताची!

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील आदर्श गाव कुसळंब येथे महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त विविध उपक्रमाची रेलचेल पाहायला मिळणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातील लोकप्रिय शाहीर शितलताई साठे यांचा शाहिरी जलसा पाहायला मिळणार आहे. तसेच मोफत आरोग्य तपासणी, भव्य रक्तदान शिबिर त्याचबरोबर बाबासाहेबांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक निघणार आहे अशा विविध उपक्रमाची रेलचेल कुसळंबमध्ये भीम जयंती निमित्त पाहायला मिळणार आहे. २६ एप्रिल रोजी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती कुसळंब येथे विविध सामाजिक उपक्रमातून साजरी होणार असून यासाठी महाराष्ट्रातील प्रसिद्ध शाहीर शितलताई साठे यांच्या शाहिरी जलसा पाहायला मिळणार आहे. तसेच मोफत आरोग्य तपासणी, भव्य रक्तदान शिबिर तसेच बाबासाहेबांच्या प्रतिमेची भव्य दिव्य मिरवणूक गावातून निघणार असल्याची माहिती आयोजित कमिटी कडून देण्यात आली आहे.

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त २६ एप्रिल रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र कुसळंब येथे मोफत आरोग्य तपासणी घेण्यात येणार आहे, या शिबिराचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आव्हान आयोजित कमिटीकडून अतुल शेलार व बाळासाहेब गायकवाड यांनी केले आहे. कुसळंब येथे महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रथमच विविध कार्यक्रमाचे रेलचेल पाहायला मिळणार आहे यामध्ये महाराष्ट्रातील प्रसिद्ध शाहीर शितलताई साठे यांचा शाहिरी जलसा तसेच मोफत आरोग्य तपासणी, भव्य रक्तदान शिबिर, पुस्तकांचे वाटप तसेच भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचा आव्हान आयोजित भीम जयंती कमिटी अध्यक्ष अशोक शेलार, किरण गायकवाड, स्वप्निल शेलार, नितीन शेलार, बाळासाहेब गायकवाड, दीपक शेलार, अमोल शेलार, यांनी आव्हान केले आहे. कुसळंब येथे प्रथमच भव्य दिव्य अशी भीम जयंती मोठ्या उत्साहात साजरी होत असून विविध सामाजिक उपक्रमातून जयंती साजरी करण्याचा संकल्प केला आहे. रक्तदान शिबिर करून महामानवाला अभिवादन करण्याचा संकल्प केला असल्याने कुसळंबसह परिसरातील नागरिकांनी रक्तदान शिबिरात सहभाग नोंदवून रक्तदान करून महामानवाला अभिवादन करावे असे आव्हान पत्रकार सचिन पवार यांनी केले आहे.

हिवताप कार्यालयातून बोगस हंगामी फवारणी प्रमाणपत्र वाटप

पाटोदा । प्रतिनिधी

बीडच्या हिवताप कार्यालयातून बोगस हंगामी फवारणी प्रमाणपत्र एका उमेदवाराला दिले आहे. त्यामुळे मी पात्र असूनही आरोग्य सेवक होऊ शकत नाही याची चौकशी होऊन कारवाई व्हावी या मागणीसाठी सोलापूरचे उमेदवार २३ एप्रिल रोजी हिवताप करायला समोर दिला आहे उमेदवाराचे नाव प्रमोद लक्ष्मण सरोदे. राहणार बार्शी जिल्हा सोलापूर. याची सांगली जिल्हा परिषदेमध्ये सर्व सेवेने भरती झाली परंतु या पदासाठी हंगामी फवारणी प्रमाणपत्र असणाऱ्याना प्राधान्य दिले जाते. प्रमोद याला १४८ गुण आहेत परंतु बीड मधील विशाल मच्छिंद्र सानप याला ९६ गुण आहेत. परंतु त्याच्याकडे हंगामी प्रमाणपत्र असल्याने. त्याची या जागेसाठी निवड होणार आहे सांगली जिल्हा परिषदेला बीडच्या हिवताप कार्यालयाने. विशाल हा पात्र आहे असा अहवाल दिला आहे. त्यामुळे आपल्या अन्याय होत असून याची चौकशी करावी व विशाल हा अपात्र करून होणारा अन्याय दूर करावा अशी मागणी प्रमोद. यांनी. जिल्हाधिकाऱ्याने आणि पोलीस अध्यक्ष यांच्याकडे केली आहे

परशुराम जन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम

अंबाजोगाई । प्रतिनिधी

ब्राम्हण ऐक्य परिषदेच्या वतीने भगवान श्री परशुराम जन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संयोजन समितीने दिली. दि.२७ एप्रिल रविवार रोजी भजन स्पर्धा होणार असून या स्पर्धेसाठी पूर्व नोंदणी आवश्यक आहे दि.२९ एप्रिल, मंगळवार रोजी दुपारी पाच वाजता शहरातील मुख्य मार्गावरून मोटर सायकल रॅली निघणार आहे. तर दि.३०एप्रिल बुधवार रोजी बाजीप्रभु देशपांडे चौक देशपांडे गल्ली येथून पालखी सोहळा प्रारंभ होईल सर्व समाज बांधवांनी सहभाग नोंदविण्याचे आवाहन ब्राम्हण ऐक्य परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.

कराटे स्पर्धेत हितांशी मुगदिया ला 'सुवर्ण'

माजलगाव । प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय खुल्या कराटे स्पर्धेत माजलगाव येथील 'के.टी.ब्रुसली सेल्फ डिफेन्स कराटे अर्कॅडमी' च्या विद्यार्थिनी असलेल्या दोघी बहिणी हितांशी रितेश मुगदिया (वय ६ वर्ष) हिने सुवर्ण पदक तर रिदम रितेश मुगदिया (वय १० वर्ष) हिने रौप्य पदक पटकाविले. ही स्पर्धा दि.१८ एप्रिल २०२५, शुक्रवार रोजी गजानन हॉल, हरसूल पोलीस स्टेशन, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आली होती. या दोघींबरोबर याच अर्कॅडमीच्या १२ खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत एकूण १२ पदकांची लयलूट केली. अर्कॅडमीचे सुवर्ण पदक विजेते खेळाडू हितांशी मुगदिया, अन्वी सारडा, रेणू पंडित, संध्या कुटे, जान्हवी होके, आदर्श पवार, हर्षवर्धन जाधवर तर अर्कॅडमीचे रौप्य पदक विजेते खेळाडू रिदम मुगदिया, आरव सारडा, श्रीपदम भावसार, प्रज्वल उजगरे, नंदनी राठोड हे आहेत. या यशामुळे माजलगावच्या के.टी.ब्रुसली सेल्फ डिफेन्स कराटे अर्कॅडमीचे नाव उज्वल झाले असून प्रशिक्षकांचे आणि पालकांचे अभिनंदन होत आहे. या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे गावभर कौतुक होत आहे.

केज, परळी, धारूर व अंबाजोगाईतील भाजप तालुकाध्यक्ष निश्चित केवळ औपचारिक घोषणा बाकी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील भाजपच्या तालुका पदाधिकारी यांच्या निवडीचा कालावधी संपुष्टात आला असून नव्या तालुकाध्यक्षांचे वेध बीड जिल्ह्याला लागले आहेत. तालुकाध्यक्षाची निवड करताना पक्ष नेतृत्व वेगवेगळे निकष लावत असतात.त्यानुसार परळी, केज, अंबाजोगाई व धारूर तालुक्याच्या अध्यक्षाच्या निवडी अंतिम मानल्या जात असून पुढील आठवड्यात किंवा याच आठवड्याअखेर नवीन तालुकाध्यक्ष या चारही तालुक्यासह इतर तालुक्यांना मिळणार आहेत. परळी तालुकाध्यक्ष पदासाठी प्रा.डॉ.बिभीषण फड, अंबाजोगाई संजय गंभीरे,केज शरद इंगळे व धारूर तालुका अध्यक्ष पदासाठी संदीप काचगुंडे यांची नावे पुढे आले आहेत आणि तेच अंतिम होतील अशी शक्यता वर्तवली जात आहे.

बीड जिल्ह्यातील ११ तालुक्यातील १९ मंडळामधून तालुकाध्यक्ष निवडला जाणार आहे. सर्वच तालुक्यात पक्षनिरीक्षक जाऊन आले आहेत. त्या- त्या ठिकाणचा अहवाल पक्षनिरीक्षकांनी पक्षाकडे व नेतृत्वाकडे पाठवला आहे.आष्टी मतदार संघात मात्र संघर्ष दिसून आला त्या ठिकाणी ना. पंकजाताई मुंडे विरुद्ध आ.सुरेश धस समर्थकांनी वेगवेगळ्या बैठका घेऊन आरोपांची राळ उठवली व बैठका वादळी झाल्या परंतु इतर तालुक्यातील इच्छुकांनी मात्र सर्व अधिकार ना.पंकजाताई मुंडे यांना दिले आणि त्याच तालुकाध्यक्ष पदासाठी योग्य व्यक्तीची निवड करतील अशी जबाबदारी देण्यात आली.येणाऱ्या काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या दृष्टीने सर्व राजकीय, सामाजिक समीकरणाचा व परिस्थितीचा अभ्यास करून तालुकाध्यक्ष निवडावा लागतो सर्व जाती धर्माचा समतोल राखावा लागतो. समन्वय आणि समन्यायाची भूमिका ठरवणारा

तालुकाध्यक्ष हवा असतो.त्या अनुषंगाने परळी,केज, धारूर,अंबाजोगाई तालुकाध्यक्ष अंतिम झाले असून येत्या आठवड्यात किंवा याच आठवड्याच्या शेवटच्या क्षणी निवडी जाहीर होणार आहेत. केज तालुकाध्यक्ष म्हणून शरद इंगळे यांची निवड होणार असल्याची माहिती आहे.सध्या शरद इंगळे हे केज विधानसभा अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.ना.पंकजाताई मुंडे व आ.नमिताताई मुंदडा यांचे विश्वासू सहकारी आहेत शिवाय मराठा समाजातील प्रमुख चेहरा मानला जातो.पक्षकार्यासाठी पूर्णवेळ देऊ शकतात व त्याची तयारी आहे. शिवाय मतदारसंघात त्यांचा चांगला जनसंपर्क आहे. मितभाषी आणि समन्वय हे त्यांचे महत्त्वपूर्ण गुण मानले जातात. म्हणून त्यांच्या नावाला अधिक पसंती असल्याचे कळते.अंबाजोगाईतून संजय गंभीरे यांचे नाव आघाडीवर आहे.नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत संजय गंभीरे यांनी कामाची चुणूक दाखवली आहे. संघटन कौशल्य आणि पूर्णवेळ पक्ष कार्य हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. ' जीती हुई बाजी हारणेवाले को बाजीगर कहते है ' त्याप्रमाणे त्यांनी हातातून गेलेली बाजी पुन्हा परत मिळवण्यासाठी केलेले मेहनत हे या मतदारसंघाला माहिती आहे. ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा व युवा नेते अक्षय मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली केज विधानसभा मतदारसंघाची ही जागा जिंकण्याचे कसब संजय गंभीरे यांनी दाखवले आहे. मुंडे व मुंदडा कुटुंबातील दुवा म्हणून त्यांचे काम आहे म्हणून त्यांच्या नावाला हिरवा कंदील दाखवला असल्याचे समजते. धारूर तालुकाअध्यक्ष पदासाठी संदीप शिवाजीराव काचगुंडे यांचे नाव पुढे आले आहे. ३१ वर्षाचा हा तरुण आसारडोह गावचा रहिवासी आहे.

माजलगाव मतदार संघाच्या निवडणुकीत महायुतीला चांगले मताधिक्य देण्याचे काम संदीप यांनी केले आहे. त्यांची आई ही पंचायत समिती सभापती म्हणून राहिलेली आहे. शिवाय राजकीय पिंड आहे आणि लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे व काचगुंडे कुटुंबियांचे जिव्हाळ्याचे संबंध राहिलेले आहेत म्हणून त्यांचे नाव अंतिम मानले जाते. परळी तालुकाअध्यक्ष पदासाठी प्रा. डॉ. बिभीषण फड यांचे नाव पुढे आले आहे. प्रा.डॉ.फड हे पंकजाताई मुंडे यांचे निष्ठावंत सहकारी आहेत.तसेच परळी पंचायत समितीचे काही काळ सभापती राहिलेले आहेत. राजकीय व सामाजिक कार्यात हातखंडा आहे. शिक्षण क्षेत्रात असल्याने त्यांना सामाजिक जाणीव आहे.ध्येयनिष्ठ कार्यकर्ता म्हणून त्यांना ओळखले जाते. समन्वय व संघटन असल्याने त्यांच्यावर तालुकाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवली जाणार आहे. एकूणच बीड जिल्ह्यातील तालुका अध्यक्षपदाची निवड ही स्वतः पंकजाताई मुंडे करणार आहेत. केवळ आष्टी,पाटोदा व शिरूर तालुक्यातील अध्यक्षपदाचा पेच आहे. त्या ठिकाणी पक्ष नेतृत्वाकडून काय भूमिका घेतली जाते याकडे लक्ष लागले आहे. येत्या आठवड्यात नवीन तालुकाध्यक्ष मिळणार एवढे मात्र खरे.

पाकधार्जिण्या अतिरेक्यांविरोधात बीड जिल्हा शिवसेना आक्रमक!

पहलगाम पर्यटकांवर झालेल्या भ्याड हल्ल्याचा शिवसेनेकडून जाहीर निषेध

बीड । प्रतिनिधी

जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे पाकधार्जिण्या अतिरेक्यांनी पर्यटकांवर केलेल्या गोळीबार भ्याड हल्ल्यामुळे असंख्य निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला तसेच या घटनेमुळे देशभरात मोठ्या प्रमाणात दहशतीचे वातावरण निर्माण झाले. पाकधार्जिण्या अतिरेक्यांनी पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ आज दुपारी १२.०० वाजताच्या दरम्यान धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. दरम्यान संतप्त शिवसैनिकांनी अतिरेक्यांच्या फोटोला जोडे मारत मुडदाबाद मुडदाबाद पाकिस्तान मुडदाबाद अशा घोषणा दिल्या. भारत देश यशाची

उंची गाठत असताना वारंवार पाकधार्जिन अतिरेकी दहशत पसरवण्यासाठी असे भ्याड हल्ले करतात. देशातील निष्पाप लोकांचे बळी घेतात. मात्र देशाची सुरक्षा यंत्रणा त्यांना शोधण्यासाठी कामाला लागलेली आहे. एक शिवसैनिक म्हणून माझी इच्छा आहे जिथे पाकधर्जिन अतिरेकी दिसतील तिथेच त्यांना गोळ्या घालव्यात ज्याने करून इथून पुढे कुणी आपल्या देशकडे डोळा वर करून पाहायची हिंम्मत करणार नाही. पाकधर्जिन अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा बीड जिल्हा शिवसेनेकडून तीव्र जाहीर निषेश व्यक्त करण्यासाठी आम्ही शिवसैनिकांनी रस्त्यावर उतरून हे निषेश आंदोलन केले आहे. अशी प्रतिक्रिया शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी प्रसार माध्यमांना दिली. याप्रसंगी शिवसेना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांच्या समावेत बीड जिल्हा शिवसेना, युवासेना, शेतकरी सेना, ओबीसी सेना, अनुसूचित जाती-जमाती सेना, एसटी कामगारसेना तसेच सर्व अंगीकृत संघटनांचे आजी-माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित उपस्थित होते.

जिल्ह्यात वीज पुरवठा खंडित होणार नाही याची दक्षता घ्या : अनिल बोर्डे

गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात महावितरण कडून वारंवार वीज पुरवठा खंडित होत असून वीज ग्राहक, शेतकरी वर्ग, व्यवसायिक, बालक, ज्येष्ठ नागरिक परेशान होत आहेत. विज पुरवठा खंडित होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष तथा गेवराई ग्राहक पंचायत मार्गदर्शन केंद्र अनिल बोर्डे यांनी मा.कार्यकारी अभियंता व उप कार्यकारी अभियंता श्यामजी मोरे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन ग्राहकांना होणाऱ्या त्रासाबद्दलची माहिती निवेदनाद्वारे व प्रत्यक्ष चर्चा करून दिलेली आहे. याप्रकरणी योग्य ती दक्षता घेऊन विज वारंवार खंडित होणार नाही याबाबत उपाययोजना सुधारणा करण्यात येईल अशी प्रत्यक्ष चर्चा झाली.

निवेदनात म्हटले आहे की, जिल्ह्यातील महावितरणचा

वीजपुरवठा सद्यस्थितीत वारंवार खंडित होत आहे त्यामुळे ग्राहकांना उकडा गर्मी सामना करावा लागत आहे त्यामुळे वीज ग्राहक परेशान होत आहेत यावर्षी उष्णतेची तीव्रता मोठ्या प्रमाणात असल्यामुळे वीज पुरवठा खंडित होणार नाही याबाबत तांत्रिक नियोजन आपल्या स्तरावर युद्ध पातळीवर करून जिल्ह्यातील बालक वर्ग वीज ग्राहक आजारी व्यक्तींना त्रास होणार नाही याबाबत आपल्या स्तरावर एप्रिल महिन्यापासून नियोजन करणे आवश्यक आहे. उष्णतेची तीव्रता व तांत्रिक अडचणीमुळे वीजपुरवठा वारंवार खंडित होतो असे सांगितले जाते ◀◀ पान ३ वर

भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या तालुकाध्यक्षपदी हमीदखान पठाण यांची फेर निवड

पाटोदा । प्रतिनिधी

सामाजिक कार्यात नेहमीच पुढाकार घेणारे आणि तसेच डॉ.गणेश ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली भ्रष्टाचाराच्या विरोधात सातत्याने आवाज उठवणारे पाटोदा येथील पत्रकार हमिदखान पठाण यांची भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या पाटोदा तालुकाध्यक्षपदी पुणे येथे एका बैठकीत फेर निवड करण्यात आली व निवडीची पत्र त्यांना समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. चंद्रकांत उदगुडे पाटील व महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष श्री. शांताराम खुडे पत्रकार हमिदखान पठाण यांना प्रदान करण्यात आले.पठाण यांची सामाजिक कार्याची दखल घेतली.गेल्या अनेक दिवसांपासून दिनदलित वंचित शेतकरी कष्टकरी यांच्या न्याय हक्कासाठी प्रशासनासमोर संघर्ष करत आहे तसेच पत्रकार यांच्यावर होणाऱ्या घटनेच्या विरोधात निर्भिड पुणे आवाज उठवतात त्यामुळे

त्यामुळे तालुक्यातील पत्रकार बांधवांना पत्रकार बांधवांना एक मोठा एक मोठा आधार म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते आधार म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते तसेच तहसील पंचायत समिती भुमिअभिलेख भूमी अभिलेख पोलीस स्टेशन पोलीस स्टेशन पशुसंवर्धन पशुसंवर्धन या कार्यालयामध्ये या कार्यालयामध्ये सर्वसामान्यांची सर्वसामान्य ची कामे नडली असली तर कामे नडली असली तर त्या ठिकाणी त्या ठिकाणी हमीद खान पठाण त्या नागरिकांची कामे मार्गे लावतात त्यामुळे सर्वसामान्य जनतेला दप्तर दिरंगाई तसेच लाज देण्याची गरज पडत नाही त्यामुळे सर्वसामान्य जनतेमधून अमित कान पठाण यांना मान्यता मिळालेले असून तालुक्यातील सर्वसामान्य गोरगरीब दिंडलित कष्टकरी माणूस हक्काचे व्यासपीठ म्हणून अमित कान पठाण यांच्याकडे दादमागतो व, आपल्या अडचणी मांडत असतो. त्यामुळे भ्रष्टाचार करणारांना मोठी जरब बसलेली आहे.त्यांच्या या निवडीबद्दल सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

जायकवाडीच्या पाण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर टाळ-मृदंग मोर्चा

लोकलढा आंदोलनच्या मादळमोही बैठकीत निर्धार

बीड । प्रतिनिधी

शेती पिकांसाठी पाण्यावाचून हालहाल झालेल्या बीड जिल्ह्यातील दुष्काळी भागाल जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे, नदीजोड प्रकल्प व मराठवाडा वॉटर ग्रीड योजना गतीने राबवावी यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर लोकलढा आंदोलनाच्या वतीने टाळ-मृदंग मोर्चा काढण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला. लोकलढा आंदोलनातील शेतकऱ्यांची मादळमोही (ता. गेवराई) येथे झालेल्या बैठकीत हा निर्धार करण्यात आला. यावेळी भाऊसाहेब जरांगे पाटील, अजय साळुंके पाटील, बप्पासाहेब अण्णा तळेकर, ॲड. संजय काळे, राजाभाऊ महाराज कुटे, सरपंच नवनाथ गवते, उपसरपंच परमेश्वर कोळेकर, सरपंच नंदकुमार शिंदे, विजयकुमार करपे, माजी सरपंच गणेश कोळेकर, रमेश जिजा तळेकर, अप्पासाहेब महानोर, राहुल लोंढे, समन्वयक दिनेश गुळवे, बाळासाहेब कोळेकर, देविदास चव्हाण, चंद्रहंस महाराज जाधव, गणेश हाडुळे यांची

प्रमुख उपस्थिती होती.

आपल्या दुष्काळी भागात शेतीला पाणी मिळावे यासाठी शेतकऱ्यांनी एकत्र येत लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाचे गेल्या वर्षभरातील काम व पुढील आंदोलन यावर या बैठकीत चर्चा करण्यात आली. यावेळी राजेंद्र गवते, दत्तात्रय सिरसट, दिलीप अलगुडे, शामराव घुगे, वसंत पवळ, रावसाहेब बोर्डे, दीपक कुलकर्णी, आकाश हाकाळे, संतोष नेमाने, अजिनाथ शिंदे, बप्पासाहेब रत्नपारखे, सोमनाथ मोरे, अजय पाटील, ज्ञानेश्वर तांबारे, संतोष गोरे, गणेश लवारे, रमेश जगदाळे आदी उपस्थित होते. यावेळी संजय काळे म्हणाले, की शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी शेतीला पाणी गरजेचे आहे व या पाण्यासाठी आपण संघर्ष करणे गरजेचे आहे. सरपंच नवनाथ गवते म्हणाले, की शेतकरी मुलांचे स्थलांतर रोखण्यासाठी व शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी पाणी संघर्ष मोर्चा करणे गरजेचे आहे. अप्पासाहेब महानोर यांनी गरज असलेल्या शेतीला व दुष्काळी भागाला पाणी मिळवून देण्यासाठीचा निर्धार व्यक्त केला. अप्पासाहेब वाणी यांनी मोठ्या संघर्षाशिवाय पाणी मिळणार नाही म्हणून शेतकऱ्यांनी आंदोलनात मोठ्या संख्येने उतरावे अशी हाक दिली. शेतीला पाणी मिळावे व शासनाने तात्काळ योजना सुरू करव्यात यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर टाळ-मृदंग मोर्चा काढण्याचा निर्धार यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी केला. दुष्काळी भागात जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे, नदीजोड प्रकल्प व मराठवाडा वॉटर ग्रीड योजना गतीने सुरू करावी यासाठी टोकाचा संघर्ष करणार, असा इशारा यावेळी अजय साळुंके पाटील यांनी दिला.या आंदोलनात शेतकरीव शेतकरी पुत्रांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन गणेश कोळेकर यांनी केले.

बीड गट शिक्षण कार्यालयातर्फे शिक्षण विषयक एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या गट शिक्षण विभागातर्फे तालुका गट शिक्षण अधिकारी कार्यालय, बीड यांच्या वतीने दिनांक २३ एप्रिल २०२५ रोजी विविध शैक्षणिक काम काजांसंदर्भात एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन शिवाजी विद्यालय बीड येथे करण्यात आले. सदर कार्यशाळा दुपारी १२ वाजता सुरू झाली. या कार्यशाळेचे अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी मा. श्री. समंदर खान हे होते. त्यांनी उपस्थित मुख्याध्यापकांना शाळांमधील विविध शैक्षणिक व प्रशासकीय बाबींवर सखोल मार्गदर्शन केले. शिक्षणाशी निगडित महत्त्वाच्या १२ मुद्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या वेळी शिक्षण विस्तार अधिकारी मधुकर तोडकर,

श्री माटे ,श्रीमती गंगाखेडकर मॅडम, श्री क्षीरसागर, सर्व केंद्रप्रमुख व साधन व्यक्ती मोमीन इसहाक आदी उपस्थित होते.

कार्यशाळेत प्रमुख मुद्द्यांमध्ये खालील बाबींचा समावेश होता: स्कुल मॅपिंग शाळांचे नकाशीकरण, विद्यार्थ्यांची वस्तुनिष्ठ विभागणी, व स्थानिक गरजेनुसार शाळांचे पुनर्रचना सुचवणे. आधार अपडेट विद्यार्थ्यांचे आधार क्रमाक अपडेट करून यू डायस प्रणालीशी लिंक करणे. अपार रजिस्ट्रेशन विद्यार्थ्यांसाठी केंद्र शासनाच्या अप्पार योजनेत ऑनलाइन नोंदणी. निपुण महाराष्ट्र अंतर्गत विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी ऑनलाइन माहिती भरावी लागणार असून त्यासंबंधी मार्गदर्शन देण्यात आले.

◀◀ पान ३ वर

नाथापुरात चोरट्यांनी मारला लाखोंचा डल्ला

नाथापूर । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नाथापुर या गावी काल दि. २१/४/२५ रोजी रात्री गिराम संतोष रामप्रसाद यांचे घर चोरट्याने फोडून घरातील कपाटातून चार तोळे सोने व नगदी १४ हजारांची रोख रक्कम पसारा केली आहे. सदरील घर नाथापूर येथील भोई गल्ली च्या एका बाजूला असल्यामुळे चोरट्याने त्याचा फायदा घेतला विशेष घरातील सर्व उन्हाळा असल्यामुळे घराच्या स्लॅब वर झोपले होते व घर मालक हा लाईट खात्यात ऑपरेटर म्हणून असल्याने ते ड्युटीवर होते.या गावात वर्षातून एक दोन वेळेस घर फोडी नक्कीच होते,परंतु आतापर्यंत एकही चोरीचा तपास लागलेला नाही. या भागात अवैध धंदा तर खूपच बोकाळलेला आहे, नवीन आलेल्या पिंपळनेर पोलीस स्टेशन च्या पी एस आय पूजा पवार मॅडम यांनी याकडे लक्ष द्यावे व नाथापूर व परिसरात रात्रीची गस्त चालू करावी अशी या भागातील लोकांची मागणी आहे. नाथापुराच्या आठवडी बाजार दिवशी पण मोबाईल चोरट्याचे प्रमाण वाढलेले आहे. आज रोजी सकाळी रीतसर पंचनामा झाला असून याप्रसंगी बीट आमालदार मिसाळ व त्यांचे सहकारी विशेष म्हणजे प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक पूजा पवार ह्या स्वतः उपस्थित होत्या मॅडमकडून या तपासाची वाटचाल योग्य दिशेने होऊन या चोरीचा तपास लवकरच लागेल अशी गावकऱ्यांनी अपेक्षा व्यक्त केली आहे.

आदिवासी महिलांना वाईट हेतूने छेडछाड करुन शिवीगाळ

शिरुर पोलीस तक्रार घेत नसल्याने पोलीस अधिक्षकांकडे लेखी तक्रार

बीड । प्रतिनिधी

शिरुर तालुक्यातील वारणी गावातील आदिवासी महिलांना गावातीलच काही लोकांकडून सतत वाईट हेतूने छेडछाड करुन शिवीगाळ करण्यात आल्याची घटना घडली आहे या बाबत या महिलांनी सुरुवातीला शिरुर कासार पोलीस स्टेशन येथे तक्रार देण्याचा प्रयत्न केला असता पोलीसांनी तक्रार घेतली नाही उलट महिलांना हाकलून दिले म्हणून या महिलांकडून पोलीस अधिक्षक कार्यालय येथे लेखी तक्रार देण्यात आली आहे.

याबाबत माहिती अशी की, शिरुर तालुक्यातील वारणी गावातील आदिवासी भिल्ल समाजाचे लोक राहतात. मोलमजुरी व ऊसतोडणी करुन हे लोक उदरनिर्वाह करतात काही दिवसांपासुन तक्रार देणार्या महिलांचे पती चुकीच्या गुन्ह्यात जेलमध्ये आहेत या गोष्टीचा गैरफायदा घेवून या गावातील काही गुंड प्रवृत्तीचे लोक यांनी वेळोवेळी वाईट नजर ठेवुन, लज्जास्पद शब्द वापरुन महिलांची किंमत विचारणे सारखे प्रकार केले आहेत जर या महिलांनी विरोध केला तर त्यांच्या राहत्या घरावर दगड, काठयाने मारणे, दरवाज्यावर कुर्हाडीने मारणे असे प्रकार घडतात याची तक्रार त्यांनी पोलीस स्टेशन शिरुर (का.) येथे दिली असता अगदी पोलीस स्टेशन समोर महिलांच्या हाताला धरुन व पुरुष लोकांचा जमाव जमा करुन ओढाओढ केलेली आहे याचे व्हिडीओ देखील पुरावा म्हणून महिलांकडे आहेत.

याबाबत शिरुर पोलीस स्टेशन येथे जावुन तक्रार देण्याचा प्रयत्न केलेला असुन तेथील पोलीसांनी तक्रार घेण्याऐवजी तक्रारदार महिलांनाच बेईज्जत करुन तेथुन हाकलुन देतात त्यामुळे या महिलांनी आज रोजी पोलीस अधिक्षक बीड यांच्याकडे लेखी तक्रार दिली आहे सदरील महिलांना खुप दिवसांपासून त्रास चालु आहे त्यामुळे आरोपींवर कठोर कारवाई करावी व न्याय न दिल्यास दिनांक २८/०४/२०२५ वार सोमवार रोजी पिडीत आदिवासी महिला बेमुदत उपोषणास बसणार असल्याचे पत्रकाद्वारे कळविले आहे.

जाधव परिवाराला साने गुरुजी कर्मचारी कल्याण मंडळाची मदत; रणवीर पंडित यांच्या हस्ते धनादेशाचे वाटप

गेवराई । प्रतिनिधी

जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचेकर्मचारी स्वर्गीय सुरेश जाधव यांच्या परिवाराला साने गुरुजी कर्मचारी कल्याण मंडळाच्या वतीने आर्थिक मदतीचे वाटप शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या हस्ते करण्यात आले.

जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अमरसिंह पंडित यांच्या संकल्पनेतून जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्यांना विविध आजारात मदत केली जाते तसेच सेवेत निधन झालेल्या कर्मचाऱ्यांच्या

परिवारालाही आर्थिक मदतीचे वाटप करण्यात येते. जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय रामपुरी येथील पर्यवेक्षक जाधव सुरेश भिमराव यांचे अल्पशा आजाराने निधन झाल्यामुळे त्यांच्या कुटुंबाला साने गुरुजी कर्मचारी कल्याण मंडळ गेवराई कडून आर्थिक मदतीसाठी एक लाख रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला. शारदा स्पोर्ट्स ॲकडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या हस्ते आर्थिक मदतीचा धनादेश जाधव परिवाराला देण्यात आला. यावेळी साने गुरुजी कर्मचारी कल्याण मंडळाचे अध्यक्ष भागवतराव राऊत, मंडळाचे व्यवस्थापक श्रीराम शेळके, रामपूरी विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक तौर माजी मुख्याध्यापक बाबुराव टकले, माजी क्रिडा शिक्षक भवार यांच्यासह कार्मचारी उपस्थित होते.

मंत्री ना.अतुल सावे यांच्याकडे भाग्यश्रीताई ढाकणे यांच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन!

मानूर । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे सन्माननीय मंत्री महोदय नामदार अतुलजी सावे साहेब यांच्याकडे भाजपा भटक्या विमुक्त आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षा श्रीमती भाग्यश्रीताई ढाकणे यांच्या वतीने शनिवारी भटक्या विमुक्त जाती जमातीच्या विकासाच्या अनुषंगाने विविध मागण्यांचे लेखी निवेदन सादर केले आहे. यामध्ये तांड्या, वाड्या, वस्ती सुधारणे तसेच पाणी रस्ते वीज आदी प्रश्नांच्या अनुषंगाने व्यापक चर्चा करण्यात

भटक्या लोकांच्या विविध विकासात्मक मुद्द्यांवर विस्तृत चर्चा

आली.

भाजपा भटक्या विमुक्त आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षा आणि कर्तव्यदक्ष उच्च शिक्षित महिला श्रीमती भाग्यश्री ढाकणे यांनी सामाजिक क्षेत्रामध्ये फार मोठे योगदान दिले आहे. सातत्याने विविध प्रश्नांच्या अनुषंगाने पुढाकार घेत सर्वसामान्यांच्या प्रश्नांचा वेध घेण्याची त्यांची भूमिका सर्वश्रुत आहे.

त्या अनुषंगाने रविवारी सन्माननीय मंत्री महोदय अतुल जी सावे ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

पुण्यातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी नवा प्लॅन ; पुणे पालिकेचा सर्वंकष मोबिलिटी प्लॅन

पुणे । प्रतिनिधी

शहराच्या ईशान्य भागातील वाढती वाहतूककोंडी सोडविण्यासाठी पुणे महापालिकेने विमानतळ क्षेत्र एकात्मता आराखड्यासह नगर रस्त्याचा सर्वंकष मोबिलिटी प्लॅन तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. या वेगाने विकसित होत असलेल्या भागाला भेडसावणाऱ्या तीव्र रहदारीच्या समस्येवर दीर्घकालीन उपाय शोधण्यासाठी महापालिका सल्लागार नेमणार आहे.

खासगी वाहनांची झपाट्याने होणारी वाढ, शहरी भागाचा विस्तार आणि अपुऱ्या वाहतुकीच्या पायाभूत सुविधांमुळे पुण्यातील वाहतुकीची समस्या निर्माण झाली आहे. शहराच्या ईशान्य भागात, ज्यात नगर रोड, विश्रांतवाडी, विमान नगर, पुणे विमानतळ परिसर आणि वाघोलीचा समावेश आहे. या सर्व भागात अलीकडील काही वर्षांत निवासी, व्यावसायिक आणि संस्थात्मक आस्थापनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. विमानतळ परिसर शहराचे महत्त्वाचे

प्रवेशद्वार म्हणून काम करतो, तर नगर रोड दक्षिणेकडील महत्त्वाच्या आयटी झोन आणि ईशान्येकडील विस्तारित उपनगरांना जोडतो. मात्र, समन्वयाचा अभाव वाहतुकीचे नियोजन नसल्यामुळे विशेषत: गर्दीच्या वेळी ट्रॅफिक जॅम असते. राजकीय बातम्या वाचण्यासाठी क्लिक करा

वाहतुकीचे नियमन करण्यासाठी महापालिकेने सदलबाबा चौक आणि शास्त्रीनगर चौक, असे दोन उड्डाणपूल आणि ग्रेड सेपरेटर प्रस्तावित केले आहेत. त्याशिवाय वनाज-रामवाडी मेट्रो मार्ग वाघोलीपर्यंत वाढविण्यात आला आहे. महाराष्ट्र स्टेट इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेडने (एमएसआयडीसीएल) विमाननगर ते शिरूर एलिव्हेटेड उड्डाणपूल प्रस्तावित केला आहे. नगर रोड हा पुण्यातील प्रमुख रस्त्यांपैकी एक असला, तरी तो सर्वाधिक वर्दळीचा रस्ता बनला आहे. या समस्येवर मात करण्यासाठी महापालिकेने उड्डाणपूल, ग्रेड सेपरेटर, मेट्रो प्रकल्पाचा विस्तार असे अनेक उपाय सुचवले आहेत. राज्य सरकारने रिंगरोड आणि पुणे ते शिरूर, असा ५३ किलोमीटरचा एलिव्हेटेड रोड तयार केला आहे. या सर्व घडामोडी लक्षात घेऊन महापालिकेने सर्वसमावेशक मोबिलिटी प्लॅन तयार करण्याचा निर्णय घेतला आहे.

दोन निविदा आल्या

नगर रस्त्याचा मोबिलिटी प्लॅन तयार करणार आहे. त्यासाठी सल्लागार नेमण्यात येणार आहे. त्यासाठी पुणे महापालिकेने निविदा मागविली होती. त्यामध्ये दोन जणांनी भाग घेतला आहे. सर्व प्रक्रिया करून सल्लागार नेमला जाणार आहे, असे पुणे महापालिकेच्या प्रकल्प विभागाचे मुख्य अभियंता युवराज देशमुख यांनी सांगितले.

महाराष्ट्रसंबंधित बातम्या वाचण्यासाठी क्लिक करा

पुण्यात अपघाताची मोठी घटना घडली आहे. डेक्कन परिसरातील घोले रस्त्यावर भरधाव कारच्या धडकेत दुचाकीस्वार ज्येष्ठाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी कारचालकावर डेक्कन पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. रेणुकदास नारायण जोशी (वय ६५) असे मृत्युमुखी पडलेल्या ज्येष्ठाचे नाव आहे. याप्रकरणी मोटारचालकावर गुन्हा नोंद केला आहे. याबाबत पोलीस कर्मचारी योगेश जावळे यांनी डेक्कन पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. दुचाकीस्वार रेणुकदास जोशी १५ एप्रिल रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास झाशीची राणी चौकातून घोले रस्त्याकडे निघाले होते. झाशीची राणी चौकातील कोपऱ्यावर कारने दुचाकीला पाठीमागून धडक दिली. अपघातात जोशी गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. पोलीस उपनिरीक्षक सावंत तपास करत आहेत.

विद्यार्थ्यांना पहिल्याच वर्षी पेड इंटर्नशिपची संधी

पुणे । प्रतिनिधी

सावित्रीबाई फुले विद्यापीठाने २०२४ या शैक्षणिक वर्षापासून बी.एस्सी ब्लॉकचेन टेक्नोलॉजी या पदवी अभ्यासक्रम सुरु केली आहे. यातील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना ॲक्सेलचेन या कंपनीकडून ब्लॉकचेन प्रोजेक्टवर पेड इंटर्नशिपची संधी मिळाली आहे. पहिल्या फेरीत १२ विद्यार्थ्यांची या प्रकल्पांसाठी निवड करण्यात आली असून, इनोव्हेटिव आयडिया या संकल्पनेंतर्गत ब्लॉकचेन टेक्नोलॉजीवरील प्रोजेक्ट तयार केले जाणार आहेत.

विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनवण्याच्या महत्वकांक्षी हेतूने विद्यापीठाने बी.एस्सी ब्लॉकचेन टेक्नोलॉजी या अभ्यासक्रमाची सुरूवात केली होती. ते उद्दीष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने हे सकारात्मक पाऊल असल्याची भावना विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ. आदित्य अभ्यंकर यांनी व्यक्त केली. या वर्षीच्या बी. एस्सी ब्लॉकचेन टेक्नोलॉजी पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश अर्ज सुरु झाले आहेत.

दरम्यान, विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी म्हणाले की, प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर झपाट्याने वाढत आहे. सध्याच्या काळात डेटा सिक्युरिटीच्या बाबतीत ब्लॉकचेन टेक्नोलॉजी महत्वपूर्ण भूमिका बजावणार आहे. विद्यार्थ्यांचा या तंत्रज्ञानाकडे वाढता कल त्यांच्या करिअरच्या दृष्टीने योग्य पर्याय ठरेल.

पुण्यात एकाच दिवशी २ आगीच्या मोठ्या घटना; अग्निशमन दलाची पुरती दमछाक, अनेकांचे संसार उद्ध्वस्त

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील चंदनगर परिसरात भीषण आग लागून जवळपास १० हुन अधिक सिलेंडर फुटल्याची घटना घडली आहे. या आगीत जवळपास ५० झोपड्या जळाल्या आहेत. ही घटना चंदनगर परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर झोपडपट्टी येथे पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, चंदनगर परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर झोपडपट्टी आहे. येथे पहाटे ५ वाजता भीषण आग लागून जवळपास सात ते आठ सिलेंडरचा या आगीत स्फोट झाला आहे. तर ५० च्यावर झोपड्या जाळून खाक झाल्या आहेत. नागरिकांच्या रोज वापरतील वस्तुचे



देखील मोठ्याप्रमाणात नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाच्या आठ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. आगीवर सद्यस्थितीत नियंत्रण मिळवले असून शंभर हुन अधिक सिलेंडर बाहेर काढले आहेत. दरम्यान या घटनेत जखमी कोणी नसल्याची प्राथमिक माहिती मिळत आहेत. पहाटेच्या सुमारास आग लागल्याने अनेक लोक या झोपडपट्टीमध्ये अडकली आहेत. सध्या त्यांना बाहेर काढण्याचे काम सुरू आहे. मात्र, साखर झोपेत असतांना अनेकांना काही कळायच्या आता आगीने भडका घेतल्याने अनेकांची पूर्ती धांधल उडाली आहे. बुधवार पेठेतील दत्त मंदिराजवळील वाड्यात आग

बुधवार पेठेतील लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्त मंदिराच्या शेजारील जुन्या वाड्याला आग लागल्याची घटना घडली. ही घटना बुधवारी मध्यरात्री एक वाजून सहा मिनिटांनी घडली आहे. आगीची माहिती मिळताच अग्निशामक दलाच्या सहा बंब आणि सहा पाण्याच्या टँकरसह दल घटनास्थळी तात्काळ दाखल झाले. जवानांनी तत्परतेने आग आटोक्यात आणण्याचे काम सुरू केले.

मध्यरात्री दोन वाजेपर्यंत अग्निशामक दलाचे जवान आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्नशील होते. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. घटनास्थळी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, सुरक्षिततेच्या दृष्टीने परिसरातील नागरिकांना खबरदारीचा इशारा देण्यात आला आहे. अग्निशामक दलाकडून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

धर्मादाय रुग्णालयांना डिपॉझिट घेण्यास बंदी

पुणे । प्रतिनिधी

पैशाअभावी गर्भवती महिलेवर उपचार करण्यास नकार दिल्यामुळे संबंधित महिलेचा मृत्यू झाला. या प्रकरणाचे संपूर्ण राज्यात पडसाद उमटले. राज्य सरकारने याबाबत गांभीर्यपूर्वक लक्ष देत मोठी पावले उचल असून, यापुढे धर्मादाय रुग्णालयांना रुग्णाकडून अनामत रक्कम घेण्यास स्पष्ट मनाई करण्यात आली आहे. कोणत्याही आपत्कालीन स्थितीमध्ये रुग्णांवर प्राधान्याने उपचार करण्यात यावेत. तसेच, गर्भवतींच्या उपचारांचा आपत्कालिन परिस्थितीमध्ये समावेश करावा, या बाबींचा नव्या निर्देशांमध्ये समावेश करण्यात आला. राज्य शासनाच्या विधी व न्याय विभागाने याबाबतचा अध्यादेश

(जीआर) जारी केला आहे.

पुणे धर्मादाय आयुक्तालयाचे सहआयुक्त रजनी क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली सादर केलेल्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने सरकारकडून आठ मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. या आहवालाच्या आधारे राज्याच्या विधी व न्याय विभागाने ही नियमावली जाहीर केली आहे. गर्भवती महिला तनिषा भिसे मृत्यूप्रकरणी दीनानाथ रुग्णालयाप्रमाणेच मणिपाल, सूर्या आणि इंदिरा आयव्हीएफ या रुग्णालयांनाही महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडे अहवाल सादर करावा लागणार आहे. या सर्व रुग्णालयांचा अहवाल मिळाल्यानंतर अभ्यास करून महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल अंतिम निर्णय देणार आहे. दरम्यान, सोमवारी (दि.२१) तनिषा भिसे मृत्यू प्रकरणी मुंबईत सुनावणी पार पडली. गर्भवतीच्या नातेवाईकाने त्यांची बाजू या सुनावणीत मांडली आहे.

अशा आहेत प्रमुख सूचना

धर्मादाय रुग्णालयामध्ये जमा होणारा निर्धन रुग्ण निधी शिल्लक नसल्याच्या कारणाने रुग्ण उपचारापासून वंचित राहू नये. सर्व धर्मादाय रुग्णालयांनी महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजना, आयुष्मान भारत योजना, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम या आरोग्याशी संबंधित सर्व योजना लागू कराव्या. आयव्हीएफ खात्याबाबतची अद्ययावत माहिती रुग्णालयांकडून घेऊन धर्मादाय आयुक्त यांच्या संकेतस्थळावर नियमितपणे अद्ययावत करण्याच्या सूचना विधी व न्याय विभागाने दिलेल्या नव्या आदेशात देण्यात आल्या आहेत.

सकल जैन संघातर्फे ठिय्या आंदोलन

पुणे । प्रतिनिधी

मुंबई येथील जैन मंदिरावर कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्याला बडतर्फ करावे, तसेच त्याच ठिकाणी पुन्हा मंदिर उभारावे, यांसह विविध मागण्यांसाठी सकल जैन संघाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर ठिय्या आंदोलन करण्यात आले.

विलेपार्लेमधील जैन मंदिरांवर मुंबई महापालिकेकडून कारवाई करून पाडण्यात आले. त्यांच्या निषेधार्थ संघाच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले. या वेळी सकल जैन संघाचे विजयकांत कोठारी, अचल जैन, मिलिंद फडे, महावीर कटारिया, अभय छाजेड, प्रवीण ओसवाल, प्रीती पाटील- जैन, सुजाता शहा, डॉ. कल्याण गंगवाल यांच्यासह मोठ्या संख्येने जैन बांधव आणि महिला हातात निषेधाचे फलक घेऊन आंदोलनात सहभागी झाल्या होत्या. या वेळी सकल जैन संघाने विविध मागण्यांचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांना

दिले. जय बोलो महावीर की, हम शांत है पर कमजोर नही, मंदिर तोडा चूप नही रहेंगे, शांतीसे मार्च करेंगे,

हम शांतीसे चलते है, अपनी बात करते है', जय जयकार जैन धर्म की जय जयकार, जैन धर्म अमर रहे अशा घोषणा देत जैन समाजातील बांधवांनी मुंबई महापालिका प्रशासनाच्या कारभाराचा निषेध केला.

विलेपार्ले येथील जैन मंदिर चुकीच्या व बेकायदेशीर पद्धतीने पाडले. सर्व कायदेशीर बाबी समजून न घेता मुंबई महापालिकेने अत्यंत क्रूर पद्धतीने बुलडोझर व जेसीबीच्या सहाय्याने मंदिर उद्ध्वस्त केले, तसेच मंदिर पाडताना तेथील धार्मिक ग्रंथ, पूजा साहित्य यांची विटंबना करण्यात आली. प्रशासनाच्या या जुलमी कार्यामुळे देशातील समस्त जैन धर्मीय व समाज अत्यंत आक्रोशित झाला आहे, असे जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे.

कोंढापुरीतील सहा महिला पर्यटक पहलगामला अडकल्या ; कुटुंबियांशी संपर्क झाल्याने व्यक्त केले समाधान

शिक्रापूर । प्रतिनिधी

जम्मू काश्मीरमध्ये दहशदवादी हल्ला करुन अशांतता निर्माण करण्यात आली आहे. पहलगाम भागात भीषण दहशतवादी हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यात हिंदू पर्यटकांना लक्ष्य करण्यात आले. यामध्ये आतापर्यंत २८ पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये सहा महाराष्ट्रातील पर्यटकांचा समावेश आहे. या घटनेचे तीव्र पडसाद आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील पडत आहेत. या हल्ल्यानंतर १५० पर्यटक अडकले आहेत. पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या हल्ल्यात काही पर्यटकांचा मृत्यू झाल्याची घटना घडली असताना महाराष्ट्रातील गेलेल्या पर्यटकांचे कुटुंबीय चिंतेत आहेत. शिरुर तालुक्यातील कोंढापुरी येथील देखील सहा महिला पर्यटक तेथे अडकल्याने कुटुंबीय चिंतेत होते. मात्र जम्मू काश्मीरमध्ये या सर्व महिला सुरक्षित असल्याने गायकवाड कुटुंबियांना दिलासा मिळाला आहे.

कोंढापुरी तालुका शिरुर येथील भास्कर गायकवाड यांच्या पत्नी मनीषा गायकवाड, बहिणी तेजल गायकवाड, दिपाली गायकवाड, बहीण ललिता आदक तसेच मामाच्या मुली

दिपाली लोखंडे व रुपाली तांबे या सर्व महिला पर्यटक १५ एप्रिल रोजी पर्यटनसाठी काश्मीर येथे गेल्या होत्या. त्या २५ एप्रिल रोजी पुन्हा घरी परतणार होत्या, मात्र २२ एप्रिल रोजी काश्मीर येथे पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला. यामध्ये अनेक पर्यटक मृत पावले याबाबतची माहिती प्रसारित होताच गायकवाड कुटुंबीयांनी त्यांच्या महिलांना संपर्क केला मात्र संपर्क होत नसल्याने सर्वजण भयभीत झाले. त्यांनतर आज सकाळच्या सुमारास भास्कर गायकवाड यांचे त्यांच्या कुटुंबातील महिलांशी संपर्क होताच सर्व महिलांनी आम्ही येथील श्रीनगरमध्ये सुरक्षित असून सध्या येथे तणाव आणि सर्व सुविधा बंद असल्याचे सांगितले.

दरम्यान भास्कर गायकवाड यांनी भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष जयेश शिंदे यांना याबाबत माहिती देताच जयेश शिंदे केंदीय हवाई मंत्री मुरलीधर मोहोळ व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संपर्क साधून मदतीची मागणी केली. यावेळी सकारात्मक प्रतिसाद देत उद्या (दि.२४) स्वतंत्र विमानाने सर्व पर्यटकांना आणण्यात येणार असल्याचे केंदीय हवाई मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितल्याने गायकवाड कुटुंबियांने समाधान व्यक्त केले. कोंढापुरी ता. शिरुर येथील पहलगाममध्ये अडकलेले पर्यटकांशी संवाद साधला असता ते म्हणाले की, आमच्या कुटुंबियांशी समाचा संपर्क होत नसल्याने प्रथम आमची चिंतेत होतो, मात्र सकाळी आमचा संपर्क झाल्याने नक्कीच आनंद झालेला असून आम्हाला जयेश शिंदे यांनी मोठी मदत केली आणि उद्या आमच्या कुटुंबातील महिला घरी येणार असल्याबाबतची माहिती आम्हाला मिळाली असल्याने समाधान वाटत आहे असे भास्कर गायकवाड यांनी सांगितले आहे.

मुरलीधर मोहोळांनी घेतला आढावा

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याच्या घटनेनंतर सातत्याने परिस्थितीचा आढावा घेत आहेत. पुण्यातील दोन पर्यटकांचा दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झाला आहे. दरम्यान हल्ल्यानंतर जे पर्यटक तिथे अडकले आहेत, त्यांना सुखरूप आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पुण्यातील १५० पर्यटक अडकले आहेत. श्रीनगर ते दिल्ली विशेष विमानाने त्यांना आणण्यात येईल, आज शक्य झालं नाही तर, उद्या त्यांना सर्वांना आणू, असं आश्वासन खासदार मोहोळ यांनी दिले आहे.

चड्डी बनियन चोराला बेड्या ; साडेसात लाखांचा माल हस्तगत

पुणे । प्रतिनिधी

बडचा अंडरगारमेंट ब्रँडच्या वितरकाकडे सेल्समनचे काम करणाऱ्या एकाने तब्बल आठ लाख रुपयांचे लेडीज आणि जेंन्ट्स अंडरगारमेंट चोरल्याची घटना उघडकीस आली. त्याने हा माल अवघ्या दहा महिन्यात एका दुकानातून चोरला होता. विक्रीचा हिशोब लागत नसल्याने दुकान मालकाच्या लक्षात ही बाब आली. यानंतर सीसीटीव्ही तपासले असता ही चोरीची घटना उघडकीस आली. येरवडा पोलिसांनी सापळा रचून पळून जात असलेल्या आरोपीला अटक केली आहे. गणपत मांगीलाल डांगी (४४, रा. विठ्ठलनगर, सिंहगड रोड) असे अटक आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून साडेसात लाखांचा माल हस्तगत करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कल्याणीनगर येथील एस. एल. एन्टरप्रायजेस नावाच्या जॉकी कंपनीचे दुकानात आठ लाखांच्या मालाची चोरी झाल्याची तक्रार प्राप्त झाली होती. या प्रकरणाचा तपास करीत असताना पोलीस उपनिरीक्षक प्रदीप सुर्वे, पोलिस हवालदार

सागर जगदाळे यांना खबर मिळाली की, चोरी करणारा गणपत डांगी हा कल्याणीनगर येथे थांबलेला आहे. पोलीस पथक जवळ आल्याचा माग लागताच आरोपी पळून जाऊ लागले. पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले.

त्याच्याकडे चौकशी केली असता, तो जॉकी कंपनीच्या वितरकाकडे सेल्समन म्हणून काम करीत असल्याचे सांगितले. तो एस. एल. एंटरप्रायजेस दुकानात ऑर्डर घेण्यासाठी दिवसातून दोनदा यायचा. हे दुकान तीन मजली आहे. वरच्या मजल्यावर स्टॉक ठेवला जातो. येथे काही महिला कामगार काम करतात. आरोपी ऑर्डर घ्यायला आल्यावर काम असल्याच्या बहाण्याने वरच्या मजल्यावर जायचा. तेथील सीसीटीव्ही वळवून भिंतीच्या दिशेने ठेवायचा. यानंतर सोबत असलेल्या सॅकमध्ये लेडीज व जेन्ट्स अंडरगामेंट भरून घेऊन जायचा. तो २०२४ पासून अशा प्रकारे चोरी करीत होता. दरम्यान, दुकानात एक लाखाचा माल दाखल झाला होता. तो लगेचच संपला असल्याचे कामगार महिलांनी सांगितले. यामुळे मालक सुरेंद्र कुमार शर्मा (३४, रा.मांजरी) यांनी कामगारांकडे कोणी चोरी केली का? अशी विचारणा केली. मात्र, त्यांनी असे केले नसल्याचे सांगितले, तेव्हा दुकानातील सीसीटीव्ही तपासले असता डांगी हा वरच्या मजल्यावर संशयास्पदरित्या वावरताना दिसला. याप्रकरणी शर्मा यांनी १९ एप्रिलला येरवडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्याने चोरलेला माल घरात ठेवला होता तर काही माल इतर दुकानांमध्ये विकला होता. हा माल पोलिसांनी जप्त केला.

यामध्ये लेडीज व जेन्ट्स अंडरगारमेंट, टी शर्ट, नाईट पॅन्ट यांचा समावेश होता. ही कामगिरी उपायुक्त हिंमत जाधव, सहायक आयुक्त प्रांजली सोनवणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र शेळके, पोलीस निरीक्षक पल्लवी मेहेर, विजय ठाकर यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक सुनिल सोळुंके, श्रेणी उपनिरीक्षक प्रदीप सुर्वे यांच्या पथकाने केली.

विवाहाच्या आमिषाने तरुणीवर बलात्कार

पुणे । प्रतिनिधी

सोशल मीडियातून झालेल्या ओळखीतून एका तरुणीवर बलात्कार करण्यात आल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी एकाविरुद्ध हडपसर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. तनुज माकीन (रा. जबलपूर, मध्य प्रदेश) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी एका तरुणीने हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी आणि आरोपी तनुज यांची समाज माध्यमातून ओळख झाली होती. त्यानंतर तरुणी आणि आरोपी तनुजची मैत्री झाली. तनुजने तरुणीला विवाहाचे आमिष दाखवून तिला हडपसर भागातील सदनिकेत बोलावून घेतले. त्यानंतर त्याने तिच्यावर बलात्कार केला.

काही दिवसानंतर तरुणीने त्याच्याकडे विवाहाबाबत विचारणा केली. तेव्हा त्याने टाळाटाळ सुरू केली. 'माझ्याबरोबर विवाह करायचा असेल तर तुझी छायाचित्रे पाठवून दे', असे त्याने तिला सांगितले. तरुणीने नकार दिल्यानंतर त्याने तिच्याशी बोलणे बंद केले. तरुणीने त्याच्याकडे विचारणा केली. तेव्हा 'माझा नाद सोड नाही तर तुझ्यासह कुटुंबीयांना जिवे मारू', अशी धमकी त्याने दिली. त्याच्या धमकीमुळे घाबरलेल्या तरुणीने पोलिसांकडे

तक्रार दिली. पुढील तपास पोलीस निरीक्षक जगदाळे करीत आहेत.

अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणारे अटकेत

अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी सिंहगड रस्ता पोलिसांनी अटक केली. संदीप रवींद्र पाटील (२०), साहिल संतोष साळवे (१९, दोघे रा. मानाजीनगर, नऱ्हे) यांना अटक करण्यात आली. याबाबत पीडित मुलीच्या आईने सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपी पाटील आणि साळवे यांनी एका १४ वर्षीय मुलीशी मैत्री केली. त्यानंतर दोघांनी मुलीला धमकावून तिच्यावर बलात्कार केला. या घटनेची माहिती कुटुंबीयांना दिल्यास आई आणि भावाला जिवे मारू, अशी धमकी दिली. पोलीस उपनिरीक्षक अक्षय पाटील तपास करीत आहेत.